
कृषीवल
रायगड, सोमवार, दि. १ डिसेंबर २०२५
किंमत ४ ₹

## नियम काय आहे?

'क' वर्ग नगरपालिका सरसकट (सर्व प्रकारच्या मालमत्तांची) घरपट्टी (मालमत्ता कर) माफ करू शकत नाही. मालमत्ता कर माफ करण्याचे अधिकार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ आणि महाराष्ट्र शासनाचे निर्देश यानुसार मर्यादित आहेत. घरपट्टी (मालमत्ता कर) हा नगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य आणि अनिवार्य स्रोत आहे. रस्त्यांची देखभाल, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधा पुरवण्यासाठी हा पैसा वापरला जातो. सरसकट कर माफ केल्यास नगरपालिकेचे कामकाज पूर्णपणे ठप्प होईल, जे कायद्याला धरून नाही. नगरपालिका स्वतःहून सर्व मालमत्तांना सूट देऊ शकत नाही. कर माफी देण्यापूर्वी नगरपालिकेला महाराष्ट्र शासनाचे स्पष्ट निर्देश किंवा कायद्यातील विशिष्ट तरतूद असणे बंधनकारक आहे.



राज्यात आणि केंद्रात सत्ता तुमची, फाइल्स तुमच्याकडे, अधिकारी तुमचे आणि तरीही हद्दवाढ झाली नाही तर याला जबाबदार कोण? शेकाप? की भाजपची स्वतःची अक्षमता? शेकाप हद्दवाढ रोखतोय हा आरोप म्हणजे भाजपची राजकीय अक्कल दिवाळखोरीत गेल्याचा पुरावा आहे, असा हल्ला प्रशांत नाईक यांनी केला.

# भाजपकडून घोषणांचा धूर

## माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांचा भाजपवर हल्लाबोल

### सत्ता तुमची, फाईल्स तुमच्या तरी दोष शेकापवर? ही राजकारणाची रणनीती नाही तर भाजपची बौद्धिक दिवाळखोरी

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

**गेली पाच वर्षे निद्रावस्थेत असलेला भाजप निवडणुकीच्या तोंडावर झोपेतून जागा झाला आहे. मतदारांना आमिष दाखविण्यासाठी घरपट्टी माफ करणार, अशी घोषणा करीत आहे. पण यासाठी कायद्याची तरतूद कुठेय? अर्थसंकल्प कुठेय? कायद्यात तरतूद नसताना भाजप केवळ जुमले आणि घोषणांचा धूर काढायचं काम करीत आहे, असा पलटवार माजी नगराध्यक्ष तथा बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक प्रशांत नाईक यांनी केला आहे. भाजपचे सतीश धारप यांनी केलेल्या आरोपांचा खरपूस समाचार घेत प्रशांत नाईक यांनी भाजपच्या कामांची एकप्रकारे पोलखोलच केली.**



अलिबाग नगरपरिषद निवडूकीत शेकाप, काँग्रेसच्या उमेदवारांची चांगलीच आघाडी घेतली आहे. प्रशांत नाईक यांनी शेकापच्या माध्यमातून अलिबाग शहरात विकासाची गंगा आणली. आज मतदारही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. परिणामी, त्यांच्याविरोधात उभे राहण्यासाठी महायुतीला उमेदवारांचीही जुळवाजुळव करावी लागत होती. त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी गेल्या पाच वर्षातील अलिबागच्या विकासाकडे बोट दाखविले. पत्रकार परिषद घेऊन सतीश धारप या रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्याने अलिबाग शहरात गेल्या पाच वर्षात कोणतीच

#### भाजपच्या भ्रमाचा भोपळा फुटणार

ज्या भागात तुम्ही शिरकाव करायलाही घाबरता, त्या भागात शेकाप मजबूत आहे. प्रशांत नाईक पुढे म्हणाले, हद्दवाढ झाली तर शेकाप संपेल, असं म्हणणाऱ्यांनी आधी भूगोल तरी बघावा. ज्या भागात तुमचे झेंडे लावायलाही लोक तयार नाहीत, तिथे शेकापची नाळ जोडलेली आहे. जनमानसावर विश्वास आणि जमीनीवर संघटन ही शेकापची जमेची बाजू आहे. हद्दवाढ म्हणजे शेकापचा अंत नव्हे, तो भाजपच्या भ्रमांचा अंत आहे. भाजपच्या भ्रमाचा भोपळा लवकरच फुटेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

#### घरपट्टी माफ! कशावर, फॉरवर्डवर?

प्रशांत नाईक यांनी भाजपच्या आश्वासनांची खिल्ली उडवत विचारलं, घरपट्टी माफ! कशावर, हवा, धूर कि फॉरवर्डवर? निवडणुकीच्या तोंडावर पाच वर्षे घरपट्टी माफ करणार म्हणता? कायद्याची तरतूद कुठे? अर्थसंकल्प कुठे? की फक्त जुमले आणि घोषणांचा धूर फेकायचा? असा पलटवार त्यांनी केला. शेकापने अलिबागची सत्ता चालवली तुम्ही फक्त पोस्टर आणि घोषणाबाजी केली, असा थेट टोला प्रशांत नाईक यांनी भाजपला लगावला आहे.

#### संघर्ष सीमांचा नाही, विचारांचा आहे

२०२१ पर्यंतचा अलिबाग नगर परिषदेतील माझ्या नगराध्यक्ष पदाच्या कारकीर्दीतील कारभार स्वच्छ, पारदर्शक होता. भाजप सोशल मीडियावर फोटो, सभेत घोषणा आणि प्रत्यक्षात शून्य, असेही त्यांनी सांगितले. अंतिम सर्जनशील प्रहार करताना नाईक म्हणाले, हा संघर्ष सीमांचा नाही, तर हा विचारधारेचा सामना आहे. सत्ता येते-जाते, पण जनता उभी राहिली की ताकद आपोआप वाढते. आज परिस्थिती बदलतेय, आणि उद्या इतिहास लिहिला जाईल आणि तो आम्हीच लिहिणार, असा विश्वासही प्रशांत नाईक यांनी व्यक्त केला.

> **नगरपरिषदेला घरपट्टी माफ करण्याचा अधिकार नाही. हा शासनाचा नियम आहे. प्रत्यक्षात उत्पन्नाचा स्रोत थांबता येत नाही. ते थांबल्यास सदस्य पद रद्द होते. असे करायचे असल्यास राज्यातील सर्व नगर पालिकांचा कर माफ करावा लागणार. त्यामुळे भाजपकडून देण्यात आलेले घरपट्टी माफीचे आश्वासन खोटे आहे. भाजपकडून दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे.**
> **–अजय झुंजारराव**, कार्यालयीत चिटणीस, शेकाप

विकासकामे झाली नसल्याचा टाहो फोडला. मात्र हे आरोप पान २ वर

### दोन ट्रेलरमध्ये चिरडून एकाचा मृत्यू

**पनवेल :** स्टील मार्केट, कळंबोली येथे पेंटिंग करीत असलेल्या तीस वर्षीय तरुणाला ट्रेलरने पाठीमागून धडक दिल्याने दोन ट्रेलरमध्ये दबून त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. मनोज कुमार रामबक्स असे त्याचे नाव आहे. मनोज कुमार रामबक्स आणि मोहम्मद हे दोघे स्टील मार्केट, रोड नंबर २ च्या पदपथालगत ट्रेलर पेंटिंग करीत होता. या ट्रेलरच्या मागे सहा फूट अंतरावर दुसरा ट्रेलर उभा होता. मनोज कुमार हा ट्रेलरच्या मागील बाजूस पेंटिंग करीत असताना मोना वेअर हाऊसकडून येणारा ट्रेलर भरधाव वेगात वळण घेत असताना चालकाचे नियंत्रण सुटले व त्याने दुसऱ्या ट्रेलरला पाठीमागून ठोकर मारली.

### महाविकास आघाडीच्या शिलेदारांची
# उरणमध्ये तुफान बॅटिंग

**भाजपाच्या कारभारावर सोडले टीकास्त्र**

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

नगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात रंगात आलेला आहे. शनिवारी उरणमध्ये महाविकास आघाडीच्या शिलेदारांनी दणक्यात जाहीर सभा घेतली. त्या सभेत खासदार आणि अभिनेते अमोल कोल्हे, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी तुफान बॅटिंग केली.



उरणच्या सत्य परिस्थितीची पोलखोल नगराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणून जनतेसमोर आणली. तेव्हा विकासाच्या नावाने कोट्यवधींच्या गप्पा मारणाऱ्या उरणच्या आमदारांचा सर्वांनी समाचार घेतला. त्यामुळे उरणची सभा प्रचंड गाजली.

यावेळी संसदरत्न खासदार अमोल कोल्हे म्हणाले, उरणच्या जनतेने मीठ पिकविले, त्या मिठाची तरी जाण सत्ताधाऱ्यांनी ठेवायला हवी होती. त्यांच्याच पदरी गेल्या दहा-पंधरा वर्षांत निराशा आली आहे. उरणमध्ये आज प्राथमिक सुविधाही नाहीत, ही खेदाची बाब आहे. दोन महापालिका १५ ते २० मिनिटांच्या अंतरावर आहेत. त्यामुळे उरण हे चकचकीत शहर असेल, असा माझा अंदाज होता, परंतु तो अंदाज येथे आल्यावर खोटा ठरला. निसर्गाने उरणला भरभरून दिले आहे, पण आज उरण शहर भकास झाल्याचे दृश्य दिसतेय. याचा जाब सर्वसामान्य जनतेने विचारलाच पाहिजे. आमच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार भावना घाणेकर या उरणच्या विकासासाठी सक्षम आहेत. त्यांच्यात धमक आहे. त्या भूमिपुत्र आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार आणि नगराध्यक्षपदी भावना घाणेकर निवडून येणे ही काळाची गरज आहे.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बाळ्या मामा या सभेत गरजले. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ!, जिसका राजा व्यापारी, प्रजा भिकारी, अशी बेरकी टीका बाळ्या मामा यांनी उरणमध्ये केली. ते पुढे म्हणाले, भूमिपुत्रांनो, आपापसांतल्या मतभेदांमुळेच उरणच्या डोक्यावर येऊन कोणी तरी बसले, आता वेळ गेलेली नाही. चूक सुधारा. पान २ वर

# सुमात्रावर पुराचे संकट; ३०३ मृत्यू

**| सुमात्रा | वृत्तसंस्था |**



इंडोनेशियातील सुमात्रा बेटावर गेल्या आठवड्यापासून पूर आणि भूस्खलनाने हाहाकार माजला आहे. या आपत्तीत आतापर्यंत ३०३ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर शेकडो लोक अजूनही बेपत्ता आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. सगळीकडे चिखल साचला आहे. रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. पूल वाहून गेले आहेत. वीज आणि मोबाईल नेटवर्क बंद असल्याने अनेक गावांचा पूर्णपणे संपर्क तुटला आहे. त्यामुळे लोकांना अन्न आणि पाण्याची मदत पोहचवणंही कठीण झाले आहे.

अन्न आणि पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने स्थानिक लोक जगण्यासाठी दुकानांमध्ये लूटमार करत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओंमध्ये हे स्पष्ट दिसत आहे. लोक कंबरेइतक्या पाण्यातून चालत बंद पडलेल्या दुकानांमध्ये आणि गोदामांमध्ये घुसून तांदूळ, औषधं, गॅस सिलेंडर आणि इतर गरजेच्या वस्तू घेऊन पळत आहेत. काही लोक तुटलेल्या काचा आणि लोखंडी अडथळे पार करूनही आत शिरले आहेत. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन एजन्सीनुसार, सुमारे ३५,००० लोक बेघर झाले आहेत आणि त्यांना सध्या तात्पुरत्या छावण्यांमध्ये राहावे लागत आहे.

### चोरीचे सोने पोलिसांकडून हस्तगत

**पनवेल :** कामोठे, सेक्टर-३५ मधील प्रतीक जेम सोसायटीत राहणाऱ्या मस्कर कुटुंबांच्या घरातून सप्टेंबर महिन्यात २२ तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी फिर्यादीच्या शेजारी राहणाऱ्या मोनिका शंतनू दिघे या महिलेला अटक करून तिच्याकडून चोरीचे २२ तोळे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. मोनिका दिघे हिला सध्या पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी मस्कर कुटुंबियांनी २७ सप्टेंबर रोजी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी पान २ वर

# भाताच्या मोळ्यांना अज्ञातांनी लावली आग

**शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

पाषाणे येथील खरवंडी वाडी मधील शेतकऱ्याने साठा करून ठेवलेल्या भाताच्या मोळ्या यांना अज्ञात लोकांनी आग लावली. त्या आगीच्या घटनेने शेतकरी बाळू दरोडा यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून भाड्याने शेती करण्यासाठी घेतलेल्या शेतकऱ्यावर मोठे संकट आले आहे.



कर्जत तालुक्यातील पाषाणे ग्रामपंचायत हद्दीतील खरवंडे (आदिवासी वाडी) येथील शेतकरी बाळू गोमा दरोडा यांनी खाड्याचापाडा येथील एका शेतकऱ्याकडून शेतजमीन भातपीक लागवडीसाठी उसनवार पद्धतीने घेतली होती. उसनी घेतली होती. यावर्षी पावसाळी सुरूवात खराब झाली असताना देखील या शेतकऱ्याने मेहनत करून १५० मोळ्या भाताचे भारे बांधले होते. त्या मोळ्यांना उडवी बनवून त्यांची साठवणूक दरोडा यांनी केली होती. मात्र त्याच उडवी करून ठेवलेल्या भाताच्या मोळ्यांना पान २ वर

# सिडकोचा अतिक्रमणावर कारवाईचा धडाका

**तब्बल १०० डंपर केले जप्त**

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

सिडकोच्या जागेवर अनधिकृत ताबा मिळवून तेथे विना परवानगी वाहन पार्कींग करणाऱ्यांविरोधात थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामोठे पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच, सिडकोच्या जागेवर अवैधपणे राडारोड्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांवरही कठोर कारवाई करण्यात येत असून, या वर्षात आतापर्यंत तब्बल १०० डंपर जप्त करण्यात सिडकोच्या भरारी पथकाला यश मिळाले आहे. सिडकोच्या ५० वर्षाच्या कारकिर्दीत ही सर्वात मोठी कारवाई असून नवी मुंबई पोलिसांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली.



कामोठे येथील सेक्टर ४ मधील जुई रेसीडेन्सी इमारतीशेजारी सिडकोच्या अभियंत्यांकडे जागरूक नागरिकांनी तक्रार दाखल केल्यानंतर, ना-विकास क्षेत्रावर मातीचा भराव टाकून भूखंड निर्माण करून तो स्वमालकीचा भासविणाऱ्या व्यक्तीविरुद्ध अठरा दिवसांपूर्वी थेट फौजदारी कारवाई करण्यात आली. याच पद्धतीची आणखी एक घटना तीन दिवसांपूर्वी, म्हणजेच २७ नोव्हेंबर रोजी, कामोठे सेक्टर ५ मधील गोकुळ कॉर्नर सोसायटीजवळ घडली. सिडकोने ना-विकास क्षेत्र घोषित केलेल्या भूखंडावर दोन डंपर विना परवानगी उभे केल्याने, सिडकोच्या अभियंत्यांनी तत्काळ फौजदारी गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियंका खरटमल करत आहेत.

सिडको आपल्या स्वमालकीच्या जमिनीचे संरक्षण करण्यावर यावेळी अधिक लक्ष केंद्रीत करत असून, अतिक्रमण होऊ नये म्हणून २४ कोटी रुपयांची तरतूद कुंपण बांधणीसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे अतिक्रमणमुक्त जागांवर तातडीने पोलीस बंदोबस्तात कुंपण उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.वर्षअखेर अजून एक महिना पान २ वर

> उरण पनवेल सीमारेषेवर सध्या तब्बल ६८ कंटेनर यार्ड बेकायदेशीररीत्या सुरू असून, त्यापैकी बेलोंडाखार येथील सिडकोच्या जागेवरील एक कंटेनर यार्ड सिडकोने २८ नोव्हेंबर रोजी हटवले. याठिकाणी अंदाजे ६ हजार चौ.मी. क्षेत्रावर विटांचे बांधकाम, सुरक्षा केबिन, प्रवेशद्वार, संरक्षण भिंत इत्यादी अनधिकृत रचना पोकलेन व जेसीबीच्या साहाय्याने पाडण्यात आल्या.हे अतिक्रमण सिडकोच्या नियम व धोरणांचे उल्लंघन करून, कोणतीही परवानगी न घेता उभारण्यात आले होते. या कारवाईनंतर इतर ६७ बेकायदेशीर कंटेनर यार्ड चालकांचे धाबे दणाणले असून, वन विभाग यावर कधी कारवाईसाठी पुढे सरसावणार अशी टीका सुरू झाली आहे.

### 'मोफत योजना देशप्रगतीला बाधक'

**नवी दिल्ली :** देशातील वाढत्या मरेवडी संस्कृतीफ़आणि प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या घोषणांवर भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डी. सुब्बाराव यांनी कठोर टीका केली आहे. मोफत योजना तुम्हाला निवडणुका जिंकून देऊ शकतील, पण त्यातून देश उभा राहू शकणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे. कर्ज काढून मोफत वाटप या लेखात सुब्बाराव यांनी म्हटले आहे की, मोफत योजना देण्यामागे राजकीय वर्गाने जणू काही सर्व आर्थिक गणिते सामूहिकपणे बाजूला ठेवली आहेत. या घोषणा बहुतांश वेळा कर्ज काढून पूर्ण केल्या जातात. आजच्या उपभोगाचा भार उद्याच्या करदात्यांवर पान २ वर

### बनावट आरटीजीएस करुन फसवणूक

**पनवेल :** सोन्याचे बेबी टॉप्स तसेच नोजपीन यांच्या ऑर्डर देऊन त्या बदल्यात चेक दिला आणि बनावट आरटीजीएसच्या माध्यमातून १० लाख ६६ हजारांची ज्वेलरी घेऊन गेलेल्या जानू ऊर्फ तनिष सुधीर छाजेड याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भगाराम देवासी हे खारघर, सेक्टर-२० येथे राहत असून त्यांचा सोन्याच्या दागिन्यांचा व्यवसाय आहे. त्यांच्या व्हॉट्सअॅपवर छाजेड कुंदन ज्वेलर्स रतलाम या नावाच्या मोबाईल क्रमांकावरून जानू ऊर्फ तनिष सुधीर छाजेड याने सोन्याचे बेबी टॉप्स तसेच नोजपीनची ऑर्डर दिली. पान २ वर

**विमा उतरवण्याचे कृषी विभागाचे आवाहन | ३ लाख २६ हजार १६८ शेतकऱ्यांचे अर्ज**


# रब्बी हंगामातील पीक विम्याकडे पाठ

**| रायगड | प्रतिनिधी |**

रब्बी हंगामातील पीक विम्याकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली असून, आजपर्यंत केवळ ३ लाख २६ हजार १६८ शेतकऱ्यांनी २ लाख ६ हजार ९९५ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरवला आहे. गेल्या वर्षी सुमारे ५५ लाख शेतकऱ्यांनी हा विमा उतरवला होता.

शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, पूर, गारपीट, चक्रीवादळ, कीटक किंवा रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानापासून संरक्षण देण्यासाठी पंतप्रधान पीक विमा ही योजना राबवण्यात येते. यंदा हरभरा, कांदा आणि गव्हासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदत आहे. ज्वारीसाठी ३० नोव्हेंबर आणि उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग यांसाठी ३१ मार्च २०२६ अंतिम मुदत आहे. मात्र, विम्यासाठी शेतकऱ्यांचा अल्प प्रतिसाद आहे.

राज्यातील विमा उतरवलेल्या क्षेत्राची एकूण विमा रक्कम ८२० कोटी आहे. शेवटच्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात अर्ज येतात. त्यामुळे तांत्रिक समस्या निर्माण होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी मुदत संपण्यापूर्वीच पीक विमा उतरवण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. शेतकऱ्यांना आपले सरकार केंद्रावर योजनेसाठी अर्ज करता येणार असून, अर्ज प्रक्रियेतील अडचणींसाठी १४४४७ या हेल्पलाइन क्रमांकावर किंवा राज्य कृषी विभागाच्या krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संपर्क करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.



#### सर्वाधिक विमा उतरवणारे जिल्हे

परभणी जिल्ह्यात सर्वाधिक ५० हजार ४६२ शेतकऱ्यांनी ३३ हजार १२ हेक्टरवरील क्षेत्राचा विमा उतरवला आहे. त्यापाठोपाठ बीड जिल्ह्यातील ४४ हजार ५७४, नांदेड जिल्ह्यातील ३४ हजार ७८१ आणि लातूर जिल्ह्यातील ३२ हजार २४१ शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे.

#### अर्ज आणि विमासंरक्षित जमीन

| विभाग | अर्जांची संख्या | विमासंरक्षित जमीन (हेक्टर) |
|---|---|---|
| कोकण | ६८२३० | १.१८ |
| नाशिक | ७,९४६ | ६,६६५ |
| पुणे | ४३,०२७ | २६,१७७ |
| कोल्हापूर | १९,६४९ | १०,०३३ |
| औरंगाबाद | ७९,३७७ | ४२,४४७ |
| लातूर | १,३७,००१ | ८७,७८६ |
| अमरावती | ३७,६२१ | ३२,०७४ |
| नागपूर | १,५१९ | १,८०९ |

### शिक्षक, शिक्षकेतरांना दिलासा
# समायोजनाला स्थगिती

**| रायगड | प्रतिनिधी |**



राज्यातील शाळांतील शिक्षकांच्या समायोजनामुळे अनेक शाळा बंद पडण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. मात्र, आता शिक्षक समायोजनाला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, शैक्षणिक वर्ष वर्ष २०२५-२६च्या संचमान्यतेनंतरच समायोजनाची प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे राज्यभरातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी संचमान्यता स्थगितीबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना परिपत्रकाद्वारे निर्देश दिले आहेत. शिक्षक समायोजनाबाबत शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक, केंद्रप्रमुख सभा अशा संघटनांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर १५ मार्च रोजीच्या संचमान्यतेनुसार राज्यातील शाळांतील अतिरिक्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत सुधारित कार्यपद्धतीचा पान २ वर

# नवी मुंबईतून सहा अल्पवयीन मुली गायब




। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

शहरातील विविध भागांतून अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या घटनांची मालिकाच सुरू झाली आहे. रबाळे, एपीएमसी आणि कोपरखैरणे ठाण्यांच्या हद्दीतून चार मुली गायब झाल्याच्या ताज्या प्रकरणांनंतर, तुर्भे आणि एनआरआय सागरी पोलीस ठाण्यांतून आणखी दोन मुली बेपत्ता झाल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांत नोंदविलेल्या या तक्रारींमुळे नवी मुंबईतील अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पालकांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

तुर्भे पोलीस ठाण्याच्या हद्दीत १४ वर्षीय मुलगी घरातून बाहेर पडल्यानंतर परत न आल्याची तक्रार कुटुंबीयांनी नोंदवली आहे. परिसरातील सीसीटीव्ही, मार्गावरील हालचाली आणि मोबाईल लोकेशन्स यांचा तपास सुरू असून, एखाद्याने फूस लावून तिला पळवून नेल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, एनआरआय सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६ वर्षीय मुलगी रहस्यमयरीत्या गायब झाली आहे. ती घरात एकटी असताना अचानक दिसेनाशी झाली असून तिचा मोबाईल बंद असल्याने शोधमोहीम अधिक आव्हानात्मक झाली आहे. या मुलीचे नाव यापूर्वी काही प्रकरणांत नमूद असल्याची नोंद पोलिसांकडून देण्यात आली आहे. त्यामुळे तपासाची दिशा अधिक व्यापक ठेवून पोलिसांनी छाननी सुरू केली आहे.

रबाळे, एपीएमसी आणि कोपरखैरणे पोलीस ठाण्यांतही अशाच प्रकारे चार मुली घरा बाहेर पडल्यावर परत न आल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. बेपत्ता होण्याची कारणे अद्याप स्पष्ट नसून, अनेक प्रकरणांत कुटुंबीयांना कोणताही पुरावा किंवा हालचाल दिसून आलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार अल्पवयीन मुलगी हरवल्यास तातडीने अपहरणाचा गुन्हा नोंदविणे बंधनकारक असल्याने सर्व प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

नवी मुंबई पोलिसांनी या सर्व प्रकरणांचा एकत्रित आढावा घेत संयुक्त तपास सुरू केला आहे. विविध पोलीस ठाण्यांतील अधिकारी, तपास पथके आणि तांत्रिक पथके सीसीटीव्ही, म ोबाईल लोकेशन्स, मित्रपरिवाराशी चौकशी तसेच पूर्वीच्या नोंदींचा सखोल अभ्यास करून तपास पुढे नेत आहेत. मात्र अद्याप कोणत्याही मुलीचा ठोस मागमूस मिळालेला नाही.

या घटनांनी शहरातील पालकांची चिंता वाढवली असून, शाळा-कॉलेज परिसरापासून वसाहती आणि सार्वजनिक जागांत मुलांच्या सुरक्षेबाबत चर्चा पुन्हा वाढू लागली आहे. वाढत्या बेपत्ता मुलींच्या प्रकरणांमुळे नागरिकांच्या मनात शहरातील सुरक्षा यंत्रणांबाबत शंका निर्माण होऊ लागल्या आहेत.

दरम्यान, शहरातील नागरिकांनी सतर्क राहून याबाबत कोणतीही संशयास्पद माहिती मिळाल्यास पोलीस ठाण्यांत देण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. तसेच आपल्या अल्पवयीन मुलांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि सुरक्षिततेबाबत त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचेही पोलिसांचे म्हणणे आहे.



# पोलादपूर पोलिसांची धडकेबाज कारवाई

## ४ बैलांसह गाड्या जप्त, तिघे अटकेत

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर पोलीस स्टेशन हद्दीतील असलेल्या माटवण बौध्दवाडी येथून बेकायदेशीररीत्या गुरे वाहून नेण्यात येत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळताच त्यांनी तातडीने पोलादपूर पोलिसांना कळविले. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे व पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन चार बैलांसह तीन वाहनेही जप्त करीत तिघे आरोपी ताब्यात घेतल्याची माहिती प्राप्त झाली.

तीन वाहनांतून चार बैलांची वाहतूक होणार असल्याची खबर गोरक्षकांना मिळाल्याने त्यांनी पोलादपूर पोलिसांना खबर दिली. त्यामुळे सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांच्यासह पोलीसांनी तातडीने माटवण बौध्दवाडी परिसरात पोहोचून तानाजी गणपत मोरे (वय २६, रा. सुतार आळी, बिरवाडी) विशाल लक्ष्मण म्हस्के (वय ३१, रा. माटवण) आणि लहू महादेव वेनुपुरे (वय २६, रा. मु.पो. हिरडोशी, ता. भोर) या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातील सफेद रंगाची पिकअप (एमएच ०६ सीपी ०१६९) व पिकअप (एमएच १२ एएम ७६४९) तसेच स्विफ्ट (एमएच ११ डीएन ८१५८) या तीन वाहनांना पोलिसांनी जप्त केले.

या वाहनांत एकूण चार बैल आढळून आले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार एन. पी. कोंडाळकर करत आहेत.

# कोकण विभागीय आयुक्तांचा पालघर दौरा

**नवी मुंबई :** कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी जव्हार आणि मोखाडा तालुक्यांमध्ये आरोग्य, शिक्षण, ग्रामीण विकास आणि आदिवासी कल्याण या विविध क्षेत्रांमध्ये राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची शुक्रवारी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांच्या या दौऱ्यात विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या दौऱ्यात जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, प्रकल्प अधिकारी अपूर्वा बासुर, उपायुक्त घोरपडे, तसेच जिल्हा कृषी विकास अधिकारी सोमनाथ पिंजारी हे अधिकारी उपस्थित होते.


## जाहिर नोटिस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, माझे आशिल श्री. महेद्र बालकृष्ण घरत यांनी खालील मिळकती विक्री करण्याचे ठरविले आहे व खालील मिळकतीच्या विद्यमान मालकांनी त्यांच्या खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकी हक्कांबाबत खात्री दिली आहे व सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी असल्याबद्दलची तसेच त्यांना पणन योग्य हक्क मार्केटेबल टायटल असल्याबद्दलची खात्री दिली आहे. तरी सदर जमीन मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क हितसंबंध उदा. गहाण, दान , पोटगी, चार्ज, लिज, कोर्ट डिकी कोर्टात वादाचा विषय भाडेकरू हक्क कुळ ताबा वहिवाट लायसन्स वारसा हक्क कर्ज बोजा करार मदार मुखत्यारपत्र अक्षर अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध व मालकी अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कागदपत्रे व त्यांच्या सत्त्यप्रतीसह लेखी हरकत नोंदवुन आमची खात्री पटवुन दयावी. वरील कोणाचीही हरकत न आल्यास सदरील जमीन मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी व बोजारहित आहे व त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध व अधिकार नाही व तसा कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक समजुन उमजुन सोडुन दिलेला आहे. असे समजण्यात येईल व नंतर कोणाचीही हरकत तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** **गाव कडापे तालुका : उरण, जिल्हा: रायगड.**

| क्र | नाव | गट क्र. | क्षेत्रफळ हे. | क्षेत्रफळ आर.चौमी | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.महेद्र बालकृष्ण घरत | ३७/१७/अ | ०० | ०.०९.५० व ०.००.०० पोटखराब इतके क्षेत्र व्यवहाराचा विषय आहे. | ० | ३७ |

ठिकाण : उरण
दिनांक : ०१/१२/२०२५

**ॲड. दिप्ती ज. पाटील**
पत्ता: रियल टेक पार्क ऑफिस नं. ११०९/१०
सेक्टर ३०ए वाशी नवीमुंबई.
मोबाईल : ९०२८५६५२६०


# महायुतीत करबुर

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

राज्यातील सत्ताधारी महायुती आघाडीमध्ये गेल्या काही दिवसांमध्ये प्रचंड अंतर्गत तणाव आणि बेबनाव निर्माण झाल्याची चर्चा रंगली आहे. रविवारी दिल्लीतील सर्वपक्षीय बैठकीत महायुतीच्या तिन्ही पक्षांमधील अंतर्गत हेवेदावे किती टोकाला पोहोचले आहेत. दिल्लीत हिवाळी अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय खासदारांची बैठकी पार पडली. या बैठकीला अजित पवार गट आणि शिंदे गटाच्या प्रमुख नेत्यांनी हजेरी लावणे अपेक्षित होते. परंतु, या दोन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी दिल्लीतील या बैठकीला दांडी मारली. एरवी सर्वपक्षीय बैठकीला अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रफुल्ल पटेल किंवा सुनील तटकरे हजर राहतात. मात्र, रविवारी राष्ट्रवादीचा एकही खासदार या बैठकीला उपस्थित राहिला नाही. तर दुसरीकडे शिवसेनेचे गटनेते श्रीकांत शिंदे यांच्याऐवजी नरेश म्हस्के हजर राहिले होते. या सगळ्यामागे महाराष्ट्रात महायुतीमध्ये निर्माण झालेला अंतर्गत तणाव कारणीभूत आहे का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. येत्या २ डिसेंबरला निवडणूका होणार आहेत. महायुतीमधील तिन्ही पक्ष नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका स्वबळावर लढवत आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर सध्या तिन्ही पक्षांमध्ये संघर्ष रंगला आहे.

# सात कोटींची फसवणूक; तिघांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** रूम खरेदीधारकांनी खरेदी केलेले रूम न देता आणि रक्कम परत न करता वार्षिक व्याज परताव्याचे आमिष दाखवले आणि सात कोटींची फसवणूक केल्याप्रकरणी अधिराज कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मालक निकुंज गुप्ता, ब्रिजभूषण गुप्ता आणि कुंजबिहारी गुप्ता यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २६ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सुरज गुरव हे खारघर सेक्टर २१ येथे राहत असून त्यांनी अधिराज कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या रोहिंजण येथील ४३ व्या माळ्यावरील दोन रूमची खरेदी करण्याचे ठरवले. त्यांनी बुकिंग रक्कम २७ लाख ५९ हजार चेकद्वारे दिली. दोन रूम बुक केले. त्यानंतर वेळोवेळी त्यांनी एक कोटी ४९ लाख इतकी रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर केली आणि त्याच्या पावत्या त्यांना मिळाल्या. काही दिवसांनी त्यांना रूम खरेदी धारक हे त्यांना कंपनीला देणे असलेल्या भविष्यातील हप्त्यासाठी आगाऊ पैसे भरू शकता आणि आगाऊ कालावधीत त्या रकमेवर नऊ टक्के वार्षिक व्याज मिळवू शकतात अशा प्रकारची योजना असल्याची माहिती देण्यात आली. मनीष कुमार, के व्ही.चरणतेज, परमानंद जैन, अनिल पुजारी, भरत झुंजारे, मनोज मल्होत्रा, आदित्य अपूर्वा, सौरभ नायर यांनी या योजनेत पैसे गुंतवले. आठ जणांनी सात कोटी २९ लाख ५७८ एवढी रक्कम बँक खात्यावर पाठवली. मात्र रूम दिले नाहीत तसेच वार्षिक व्याज परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक केली.


## PUBLIC NOTICE

**NOTICE IS HEREBY GIVEN** to the public at large that **Mr. Sameer Thukral,** residing at Jor Bagh Lane, New Delhi, Delhi – 110003 **(Note: Client to confirm the address),** is the lawful owner of the various piece and parcels of agricultural land situated, lying and being at (i) Village Nandgaon, Sub-district Murud, District Raigad more particularly described in Part A to Part F of the First Schedule hereunder written and (ii) Village Mazgaon, Sub-district Murud, District Raigad more particularly described in Part A to Part E of the Second Schedule hereunder written **("said Properties").** Mr. Sameer Thukral has agreed to sell, transfer and convey the said Properties to our Clients, free from all encumbrances.

All those persons having any right, title, interest, by way of sale, mortgage, transfer, share, lease, sub-lease, tenancy, sub-tenancy, exchange, inheritance, gift, lien, charge, trust, succession, contract or memorandum of understanding, easement, right of way, occupation, possession, reservation, etc. or otherwise howsoever, in respect of the said Properties or any part thereof are hereby required to give notice thereof in writing along with proof thereof to the undersigned at M/s. Purnanand & Co., Advocates, Fort Chambers "C", 2nd Floor, 65, Tamarind Lane, Fort, Mumbai- 400 023 and/or by email to <harshil.parekh@purnanand.co.in>, within 10 days from the date of publication of this notice, failing which, our client will presume that the right, title, interest, claim, or demand is waived and abandoned.

**FIRST SCHEDULE**

**PART A:** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 129 admeasuring 00H-28A-00Sq.M., situate, lying and being at Village Nandgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART B :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 174 admeasuring 01H-53A-00Sq.M., situate, lying and being at Village Nandgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART C :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 176 admeasuring 00H-99A-00Sq.M., situate, lying and being at Village Nandgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART D :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 182 admeasuring 01H-15A-00Sq.M., situate, lying and being at Village Nandgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART E :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 184 admeasuring 01H-09A-00Sq.M., situate, lying and being at Village Nandgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART F :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 188 admeasuring 00H-85A-00Sq.M., situate, lying and being at Village Nandgaon, Sub-district Murud, District Raigad.

**SECOND SCHEDULE**

**PART A :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 270B admeasuring 01H-47A-00Sq.M., situate, lying and being at Village Mazgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART B :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 281 admeasuring 01H-48A-00Sq.M., situate, lying and being at Village Mazgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART C :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 285 admeasuring 01H-66A-00Sq.M., situate, lying and being at Village Mazgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART D :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 289 admeasuring 01H-31A-00Sq.M., situate, lying and being at Village Mazgaon, Sub-district Murud, District Raigad.

**PART E :** All that piece and parcel of agricultural land bearing Gat No. 290 admeasuring 01H-91A-00Sq.M., situate, lying and being at Village Mazgaon, Sub-district Murud, District Raigad.

**Dated this 30th day of November, 2025.**

**For M/s Purnanand & Co**
**Partner**
**Advocates & Solicitors**
65, Tamarind Lane, Fort Chambers, "C" Wing, 2nd floor,
Fort, Mumbai – 400 023. harshil.parekh@purnanand.co.in


पान १ वरून

## भाजपकडून घोषणांचा धूर

करीत असताना त्यांनी एकप्रकारे सत्ताधारी भाजपच्याच अब्रुचे धिंदवडे काढले. कारण गेली चार वर्षे अलिबाग नगरपरिषदेत प्रशासक कामकाज पाहत होता. मात्र तरीही धारप यांनी भाजपची अब्रु वाचविण्यासाठी शेकापवर तसेच माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनाच दोष दिला. याबाबत प्रशांत नाईक यांनी सत्ताधारी भाजपचाच प्रशासक नगरपरिषदेचे कामकाज पाहत असतानाही विकासकामे का झाली नाही? असा सवाल उपस्थित केला. तसेच शेकापने अलिबागची सत्ता चालवली भाजपने फक्त पोस्टर आणि घोषणाबाजी केली, असा थेट टोला लगावला.

भाजपचे सतीश धरप यांनी केलेला आरोप म्हणजे राजकीय निराशा, भिती आणि असहायतेचा पोकळ आरडाओरडा आहे. शेकापचा हद्दवाढीला कधीच विरोध नव्हता आणि कधीच राहणार नाही, हद्दवाढ झाल्यावर शेकापची ताकद वाढेल याची जीवघेणी घबराहट भाजपला झाली आहे, असा तुफानी आणि धारदार पलटवार अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी केला.

**चार वर्षांपासून प्रशासक मग शेकाप कसा गुन्हेगार?**

चार वर्षांपासून नगरपरिषद प्रशासक चालवत आहे. तो भाजपच्या सरकारच्या आदेशाने बसलेला आहे. तरीही काही अडचणी असतील तर त्या शेकापमुळे नाही, तर भाजपच्या भंपक निती आणि निकृष्ट प्रशासनामुळे आहेत.

## 'मोफत योजना देशप्रगतीला बाधक'

ढकलणे, हे या धोरणाचे गंभीर परिणाम आहेत.सरकारे कर्ज घेऊन मोफत योजनांवर खर्च करत असल्याने शिक्षण, आरोग्य आणि भौतिक पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांतील गुंतवणूक खुंटत चालली आहे. हेच क्षेत्र दीर्घकाळात नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मदत करतात, असे ते म्हणाले. तसेच प्रत्येक मोफत योजना ही राजकीय अपयशाची स्वीकृती आहे. याचा अर्थ नेता नागरिकांना सांगतोय की, मी तुम्हाला सन्मानजनक उपजीविका आणि नियमित उत्पन्न देऊ शकत नाही. त्यामुळे, सध्या हे घ्या आणि काम चालवा., अशी टीका सुब्बाराव यांनी केली.

**आचारसंहितेची मागणी**

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून, सुब्बाराव यांनी केंद्र सरकारला मोफत योजनांसंदर्भात राष्ट्रीय आचारसंहिता तयार करण्याची मागणी केली आहे. या आचारसंहितेत मोफत योजनांवर किती खर्च करावा आणि त्याचा पैसा कुठून येणार, हे राजकीय पक्षांनी स्पष्ट करणे बंधनकारक करावे, असे त्यांचे मत आहे.

## सिडकोचा अतिक्रमणावर कारवाईचा धडाका

शिल्लक असताना, गेल्या ११ महिन्यांत मुंबई आणि नवी मुंबई परिसरात विना परवानगी राडारोडा टाकणाऱ्या चालकांविरुद्ध १०० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि दक्षता विभागप्रमुख सुरेश मेंगडे यांच्या कठोर सूचना लक्षात घेऊन सिडकोच्या अभियंत्यांनी कारवाईला वेग दिला आहे. यासाठी रात्रीच्या पाळीतही सिडकोचे भरारी पथक कार्यरत असून त्यांना स्थानिक पोलिसांची प्रभावी साथ मिळत आहे.या सर्व कारवायांमधून सिडको अतिक्रमणकर्त्यांविरुद्ध आक्रमक भूमिकेत असून स्वमालकीच्या जमिनी ताब्यात ठेवण्यासाठी झटत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

## समायोजनाला स्थगिती

अवलंब करुन समायोजन प्रक्रिया राबवून उर्वरित रिक्त पदांचा तपशिल, अतिरिक्त कर्मचारी यादी (रिक्त पदांचा प्रवर्ग, विषय, अनुदानाचा, व्यवस्थापन प्रकारासह) संचालनालयास सादर करण्याबाबत २० नोव्हेंबर रोजीच्या पत्राद्वारे क्षेत्रिय अधिकाऱ्यांस कळवण्यात आले होते. मात्र, २०२५-२६ च्या ऑनलाइन संच मान्यतेबाबतची संकेतस्थळावरील कार्यवाही अंतिम टप्यात असल्याने, तसेच २०२४-२५ मधील संचमान्यतेनुसार अतिरिक्त झालेले शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया डिसेंबर, २०२५ मध्ये राबवणे, २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया, संचमान्यता प्रसिद्ध झाल्यानंतर पुन्हा करावी लागणार आहे.

पुन्हा पुन्हा समायोजन प्रक्रिया राबवण्याऐवजी सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसारच समायोजन प्रक्रिया करणे योग्य होणार आहे. त्यामुळे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून २० नोव्हेंबर रोजीच्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याच्या पत्राला स्थगिती देण्यात येत आहे. तसेच सन २०२५-२६ च्या संचमान्यता प्रसिद्ध झाल्यानंतर निश्चित केल्या कार्यपद्धतीनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात यावे, असे शिक्षण आयुक्तांच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने यांनी संचमान्यतेच्या स्थगितीच्या निर्णयाचे स्वागत केले. २०२४-२५च्या संचमान्यतेनुसार समायोजन प्रक्रिया राबवल्यास अनेक अडचणी निर्माण होणार असल्याची, विशेषतः नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांची गैरसोय होणार असल्याची, राज्यातील ६००पेक्षा अधिक मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडण्याचा धोका असल्याची बाब मुख्याध्यापक महामंडळाने शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक यांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच २०२४-२५च्या संचमान्यतेनुसार समायोजन करण्यास स्थगिती देऊन २०२५-२६च्या संचमान्यतेनुसार समायोजन करण्याची मागणी केली होती. त्यानुसार २०२५-२६च्या संचमान्यतेनुसार समायोजन प्रक्रिया राबवण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. आता मेमध्येच समायोजन प्रक्रिया पूर्ण केल्यास कोणाचीही अडचण होणार नाही, असे माने यांनी सांगितले.

## उरणमध्ये तुफान बॅटिंग

नवी मुंबईच्या विमानतळाला दिबांचे नाव देण्याच्या हालचाली दिसत नाहीत, २० डिसेंबरपर्यंत जर केंद्र सरकारने निर्णय घेतला नाही तर मी २२ डिसेंबरला चालत भिवंडीवरून लाखोंच्या संख्येने विमानतळाला धडक देईन. दिबांचे नाव ही आपली अस्मिता आहे, तिला जर कोणी नख लावणार असेल तर भूमिपुत्र खपवून घेणार नाहीत, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

यावेळी शिवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे गरजल्या. त्या म्हणाल्या, चहापेक्षा किटली गरम. सध्या पीएंची चलती आहे. सध्या भाजपच्या काही नेत्यांच्या पीएंचे कारनामे चव्हाट्यावर येताहेत. त्यातच आता उरणमध्ये कोणा शहा नावाच्या पीएंची बायको नगराध्यक्षपदासाठी उभी करून येथील भूमिपुत्रांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे. भूमिपुत्रांनो, सावध व्हा. रात्र वैऱ्याची आहे. डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवा आणि योग्य बटन दाबून भावना घाणेकर आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या. कोविड काळात उद्धव ठाकरे यांनी शांतपणे काम केले, मात्र लशीच्या जाहिराती भाजपने केल्या. काँग्रेसने १४ लशी मोफत दिल्या, पण कधी जाहिरातबाजी केली नाही. सध्या फक्त जाहिरातबाजी सुरू आहे. देवेंद्र फडणवीस हे पक्षच फोडत नाहीत, तर कुटुंबही फोडतात, अशी खरमरीत टीका सुषमा अंधारे यांनी उरणमध्ये केली.

यावेळी आंतराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले, भावना घाणेकर या रणरागिणी आहेत. त्या अनेक वर्षे समाजासाठी लढताहेत, पायाला भिंगरी लावल्यागत त्या राज्याभर धडाडीने काम करीत आहेत. उरण शहर आज बकाल झाले आहे, त्याचा सर्वांगीण विकास व्हावा, म्हणून आम्ही महाविकास आघाडीचा सक्षम उमेदवार भावना घाणेकर यांच्या रूपाने दिला आहे. सत्ताधाऱ्यांना दिबांचा विसर पडला आहे. बोलघेवडे सत्ताधीश चालढकल करीत आहेत, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला अद्यापही दिबांचे नाव दिले गेले नाही. त्यामुळे आपल्या अस्मितेची ही लढाई आहे. हीच वेळ आहे सत्ताधीशांना जागा दाखवायची. त्यामुळे महाविकास आघाडीच्या सर्वच उमेदवारांना निवडून देऊन सत्ता परिवर्तनाची सुरुवात उरण भूमिपुत्रांच्या आणि हुतात्म्यांच्या नगरीतून करू या. यावेळी महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे सर्वच नेते उपस्थित होते.

यावेळी व्यासपिठावर माजी आमदार मनोहर भोईर, रायगड जिल्हा अध्यक्ष काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, महाराष्ट्र नवनिर्माण सेना रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश गावंड, क्रॉ. भूषण पाटील, गोपाल पाटील, नरेश रहाळकर, विनोद म्हात्रे, सुधाकर पाटील, रवी घरत, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## भाताच्या मोळ्यांना अज्ञातांनी लावली आग

अज्ञात लोकांनी आग लावली.त्या आगी मध्ये शेतकरी दरोडा यांचे मोठे नुकसान झाले असून यावर्षी पावसाने झोडपून काढलेले, कसाबसा वाचवलेले आणि कुटुंबाला हातभार लावणारे पीकही आगीत भस्मसात झाल्याने बाळू दरोडा अक्षरशः हवालदिल झाले आहेत.

या आगीत शेतकऱ्याकडे न खाण्यासाठी भात उरला, ना पेंडा देण्यासाठी. जे पीक त्याच्या संसाराला आधार देणार होते, तीच भाताची गंजी आता राख होऊन शेतात काळा ढीग बनून उरली आहे. वर्षभराची घाम गाळलेली मेहनत, कष्टाने उभा केलेला पिकाचा आधार आणि भविष्यातील एकमेव आशा क्षणात जळून खाक झाली असून त्या शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून पोलिसात त्या आगीबद्दल टाकणार देण्यात आली आहे.

## चोरीचे सोने पोलिसांकडून हस्तगत

गुन्हा नोंद केला होता. मात्र गुन्हा दाखल होऊनही पोलीस आरोपीपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप मस्कर कुटुंबियांकडून करण्यात येत होता. याप्रकरणी त्यांनी पत्रकार

परिषद घेऊन तशी भूमिका मांडली होती. मस्कर कुटुंबीयांनी म ोनिका दिघे यांच्यावर थेट आरोप केले होते आणि त्यांनीच दागिने चोरल्याचे पोलिसांना देखील सांगितले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर व.पो.नि. विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला व संशयित मोनिका दिघे यांचा पोलिसांनी तपास सुरू केला. त्यानंतर कामोठे पोलिसांनी मोनिका दिघे हिला दोन महिन्यानंतर ताब्यात घेतले आणि तिची कसून चौकशी करत तिने चोरलेले २२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले.या प्रकरणात शेजारीणच चोर निघाल्याने कामोठे वसाहतीमध्ये मोनिकाविषयी उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

## बनावट आरटीजीएस करुन फसवणूक

व्यवहार झाल्याने चेक दिला आणि चेक बँकेत टाकू नका, ऑर्डर नेताना आरटीजीएस करून चेक परत घेऊन जाईन, असे सांगितले. त्यानुसार २२ नोव्हेंबर रोजी ऑर्डर डिलिव्हरीसाठी कॉल आला. त्यानुसार भगाराम यांचा भाचा चतराराम हा एकूण १० लाख ६६ हजार रुपयांचे ज्वेलरीचे पार्सल घेऊन आला व ते जानू ऊर्फ तनिष याच्या ताब्यात दिली, आणि फर्म रामदेव आर्ट डायमंडचे अकाऊंटवर आरटीजीएस यूआरटी नंबर पाठवला. मात्र, त्यावेळी बँक बंद असल्यामुळे दोन दिवस थांबून बँकेत जाऊन यूटीआर कन्फर्म केला असता तो बनावट असल्याचे बँकेच्या वतीने सांगण्यात आले. त्यावर जानू याने दिलेल्या बँकेत चेक टाकला असता तोही बाऊन्स झाला. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर भगाराम देवासी यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस सर्व १) भास्कर काशिनाथ भगत २) प्रभाकर काशिनाथ भगत ३) बापु शंकर भगत ४) बाळकृष्ण काशिनाथ भगत ५) सुरेश काशिनाथ भगत ६) श्रीधर काशिनाथ भगत ७) प्रल्हाद काशिनाथ भगत ८) यशोदा काशिनाथ भगत उर्फ सुनिता रेवनाथ पाटील ९) इंदूबाई रामनाथ भगत १०) अमर रामनाथ भगत ११) मच्छिंद्र रामनाथ भगत १२) मंदार रामनाथ भगत १३) वैशाली नामदेव मढवी १४)वैजंती संदिप नाईक १५) शिवजी विश्वनाथ भगत १६) राजू विश्वनाथ भगत १७) अरुण जगन्नाथ भगत १८) रघुनाथ जगन्नाथ भगत १९) रतन जगन्नाथ भगत २०) प्रमोद जगन्नाथ भगत २१) गोपाळ जगन्नाथ भगत २२) संतोष जगन्नाथ भगत २३) सुशीला हरिचंद्र भगत २४) रंजीत हरिचंद्र भगत २५) मेघा नारायण पाटील २६) निलम संतोष पाटील २७) पुनम महेश घरत २८) कोमल रूपेश ठाकूर २९) पुष्पा उर्फ पुष्पाबाई शशिकांत घरत ३०) सुनीता राजेश घरत उर्फ सविता राजन घरत ३१) शैलेश नामदेव घरत ३२) कांतीलाल उर्फ कांता वसंत भगत ३३) गणेश वसंत भगत ३४) जयेंद्र वसंत भगत ३५) गंगाबाई वसंत भगत ३६) शोभा दीनानाथ कडू, सर्व राहणार - गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड- ४१० २०६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. होम रियल्टी तर्फे भागीदार **१) शिवजी आंबा गामी २) धनजी मांडन पटेल** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील: नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २२०० | २४.११.२०२५ | पुष्पक नोड | २७ | ५१ | ७००.०० चौ. मी. | १८.०८.२०२५ | १६.०९.२०२५ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३८१/२०२५-२६

# नि|व|ड|क



## अध्यक्षपदी दिपक घरत बिनविरोध

**खरोशी :** स्वर्गीय ह.बा. शिंदे गुरुजी निर्मित उरण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी ही रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य अशी पतपेढी आहे. दरम्यान, शनिवारी (दि.२९)झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत सर्वानुमते दिपक घरत यांची पतपेढीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी संचालक व माजी अध्यक्ष प्रभाकर घरत, नवनीत गावंड, राजश्री मोकल, प्रशांत पाटील, शर्मिला गावंड, मंदार रसाळ यांनी नवनिर्वाचित चेअरमन यांना शुभेच्छा देऊन गुणगौरव केला. पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश जितेकर साहेब यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष दिपक घरत यांना शुभेच्छा दिल्या.



## करिअर संधी कार्यशाळा संपन्न

**उरण :** फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयातील वाणिज्य आणि बी.कॉम विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'बँकिंग फायनान्स सर्विसेस आणि इन्शुरन्स करियर संधी' या विषयांवर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. प्रांजल भोईर यांनी केले. त्यांनी क्षेत्रातील वाढत्या करिअर संधींबाबत विद्यार्थ्यांना प्राथमिक माहिती दिली. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. क्षेत्र हे भारताच्या आर्थिक प्रगतीचा कणा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील तांत्रिक कौशल्ये, वर्तनकौशल्य आणि व्यवहारज्ञान विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे, असे ते म्हणाले. तसेच, कौशल्यविकास, सातत्यपूर्ण शिक्षण व आत्मविश्वास ही आधुनिक रोजगारक्षेत्रात यश मिळविण्याची तीन प्रमुख साधने आहेत, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्याच्या करिअर घडविण्याचे प्रेरक आवाहन केले.



## वृद्ध महिलेच्या खूनाचा छडा

**अवघ्या ८ तासांत आरोपीला बेड्या**

**महाड :** तालुक्यातील नाते येथील एका वाड्याजवळ शनिवारी (दि.२९) एक ७६ वर्षीय महिला मृत अवस्थेत आढळली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह महाड ग्रामीण रुग्णालय येथे शवविच्छेदनाकरिता आणला. सुरुवातीला पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली. मात्र, पुन्हा तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या आठ तासांत खुनाचा छडा लावला. लीलावती बलकवडे असे मृत वृद्धेचे नाव असून अभिजीत महेश अंबवले असे आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लीलावती बलकवडे या शुक्रवारी सायंकाळी आपल्या शेतातील वाड्याजवळ काम करण्याकरिता गेल्या होत्या. त्यावेळी अभिजीत अंबवले याने त्यांचा पाठलाग करून त्या एकट्या असल्याचा फायदा घेत त्यांच्या अंगावरचे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न केला. या झटापटीमध्ये अभिजीत याने त्यांचा गळा दाबून खून केला व अंगावरचे दागिने आणि मोबाईल घेऊन तो पसार झाला. सुरुवातीला नातेवाईकांनी महाड ग्रामीण रुग्णालय येथे गोंधळ केला व हा आकस्मित मृत्यू नसून खून झाला आहे, अशी माहिती प्रसारमाध्यमांना दिली होती. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक रमेश तडवी यांच्या टीमने तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या आठ तासांमध्ये हत्या करणाऱ्या आरोपीचा शोध लावला. अभिजीत अंबवले याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला न्यायालयात हजर करणार असल्याची माहिती महाड पोलिसांनी दिली आहे.

# दत्त मंदिरातील चोरीचा तपास लागेना

**● चार वर्षांनतरही चोरटे मोकाटच ● पोलिसांच्या तपासाबाबत भक्तांकडून नाराजी**



**| चौल | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त मंदिरामध्ये अज्ञात चोरट्यांनी १७ डिसेंबर २०२२ रोजी चोरी करुन मूर्तीच्या मागे लावलेली सुमारे ४० किलो चांदी लंपास केली होती. ११ डिसेंबरला येथील यात्रा संपल्यानंतर ही चोरी झाली होती. या चोरीचे सीसीटीव्ही फुटेज मिळाले असून, तपासासाठी रायगड जिल्हा पोलीस व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथक तयार करण्यात आले आहे. परंतु, चार वर्षांचा कालावधी उलटूनही चोरीचा तपास लावण्यात पोलिसांना अपयश आल्याने दत्तभक्तांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

रायगड जिल्ह्यातील मंदिरांतील दानपेट्या फोडून पैसे, देवाच्या चांदीच्या मूर्ती चोरीला गेल्याचे अनेक गुन्हे घडले आहेत. त्यातील काही चोऱ्यांचा तपास लावण्यात पोलिसांना यश आले असले तरी तालुक्यातील प्रसिद्ध चौल-भोवाळे येथील दत्त मंदिरातील चोरीचा छडा अद्याप पोलिसांना लागलेला नाही. आरोपी सापडत नसल्याने पोलिसांनी तपास करण्याचे सोडून दिले की काय, अशी भावना दत्तभक्तांकडून व्यक्त करण्यात येत आहे. चौल मंदिरातील ४० किलो चांदी चोरीला गेल्याची घटनेला आता चार वर्षे होतील; परंतु, अद्याप तपास लागलेला नाही. यंदा चौल-भोवाळे येथील दत्तयात्रेला गुरुवार, दि. ४ डिसेंबरपासून प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर दत्त मंदिरातील चोरीच्या चर्चेला पुन्हा एकदा उधाण आले आहे.

### पोलीस अधीक्षकांनी लक्ष घालावे

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक म्हणून आंचल दलाल यांनी कारभार हाती घेतल्यापासून अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत. तसेच, कामात कसूर करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचाही त्यांनी चांगला बंदोबस्त केल्याचे समजते. त्यामुळे आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली दत्त मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्यांना पकडण्यासाठी आता तरी तपासाची चक्रे गतीने फिरतील, अशी तमाम दत्तभक्तांची आशा आहे.

### उद्याप तपास नाहीच

चौल-भोवाळे येथील दत्त मंदिरात चार वर्षांपूर्वी चोरी झाली होती. या मंदिरातील तब्बल चाळीस किलो चांदीची प्रभावळ चोरीला गेली होती. मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन चोरट्यांचे छायाचित्रण आढळून आले आहे. रेवदंडा पोलीस ठाण्यात चार वर्षांमध्ये तीन अधिकारी बदलून आले. परंतु, एकाही अधिकाऱ्याला या चोरीचा तपास करता आला नाही. सध्याचे प्रभारी अधिकारी श्रीकांत किरवले यांच्याशी संपर्क साधून तपासाबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

### प्रभावी यंत्रणा राबवा

यावर्षी गुरुवार, दि. ४ डिसेंबरपासून दत्तयात्रेला प्रारंभ होत आहे. दरवर्षी या ठिकाणी पाच दिवसांची यात्रा भरते. जिल्ह्यासह राज्य-परराज्यातील अनेक व्यावसायिक या यात्रेत व्यवसायासाठी येत असतात. त्यातून लाखो रुपयांची उलाढाल होत असते. बाहेरुन येणाऱ्या अनोळखी व्यावसायिकांबरोबर सर्वच व्यावसायिकांची नोंदणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी आतापासूनच प्रभावी यंत्रणा राबविण्यात यावी, अशी मागणी दत्तभक्तांकडून होत आहे.

### आश्वासन हवेत विरले

मंदिरात चोरी झाली तेव्हा रेवदंडा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे होते. त्यांनी ग्रामस्थांना चोरांचा छडा लावून लवकरच जेरबंद करू, असे ठाम आश्वासन दिले होते. परंतु, चार वर्षांनंतरही चोर पकडले गेलेले नाहीत. एकही धागा हाती लागलेला नाही. तपास आजही तिथेच अडकलेला आहे. तत्कालिन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण विभाग उतरला, स्पेशल पथक नेमले गेले, चौकशीचे ढोल बडवले गेले. मात्र, कुठलाही सुगावा लागलानाही.

# हेल्पलाईनची राहणार लाचखोरांवर नजर

**■ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचा अनोखा उपक्रम**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचखोरांवर लक्ष ठेवण्यासाठी सोशल मिडीयाचा आधार घेतला आहे. त्यासाठी हेल्पलाईन सुरू केली असून ९९२०३५१०६४ या क्रमांकाच्या हेल्पलाईनद्वारे लाचखोरांवर नजर राहणार आहे. या हेल्पलाईनच्या क्रमांकाचा उद्घाटन समारंभ ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला.

वाढत्या आधुनिकरणामुळे सोशल मिडीयाचा वापर प्रचंड वाढला आहे. तरुणांसह सर्वच वयोगटातील मंडळी व्हॉट्सअॅप, इस्ट्राग्राम सारख्या सोशल मिडीयाचा वापर करतात. त्यामध्ये व्हॉट्सअॅपला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या संकल्पनेतून नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी डिजीटलसह आधुनिकतेचा वापर केला. भ्रष्टाचार मुक्त प्रशासन आणि पारदर्शक शासन व्यवस्था निर्माण करण्यासाठी नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने विशेष सार्वजनिक हेल्पलाईन (९०२०३५१०६४) सुरू केली आहे. या हेल्पलाईनचा लोकार्पण सोहळा अधीक्षक शिवराज पाटील यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी उपअधीक्षक धर्मराज सोनके, पोलीस निरीक्षक सुधीर निकम, किरणकुमार वाघ, अरुंधती येवळे आदी उपस्थित होते. हा हेल्पलाईन क्रमांक शासकीय कार्यालय, कंत्राटी प्रक्रीया, सरकारी कामात लाच मागितल्यास, तसेच संशयास्पद व्यवहार आढळल्यास त्वरित तक्रार नोंदविण्यासाठी उपलब्ध करण्यात आला आहे. त्यामुळे आता हेल्पलाईन लाचखोरांचा कर्दनकाळ ठरणार असून लाच घेणाऱ्यांवर हेल्पलाईनची नजर राहणार आहे.



### एसीबीकडून जनतेला आवाहन

परिसरातील नागरिकांनी सरकारी अधिकारी, कर्मचारी यांच्या विरोधात भ्रष्टाचारासंबंधी तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नवी मुंबई येथे टोल फ्री क्रमांक १०६४, दुरध्वनी क्रमांक ०२२-२७८३३३४४ तसेच व्हॉट्सॅप क्रमांक ९९२०३५१०६४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी केले आहे.

# शेजारणीचाच किमती सोन्यावर डल्ला

**■ पोलिसांच्या जलदगती तपासाने महिला तुरुंगात**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कामोठे सेक्टर ३५ मधील सुरक्षा, शिस्त आणि उच्चभ्रू रहिवाशांसाठी ओळखली जाणाऱ्या प्रतीक जेम्स सोसायटीत १६ सप्टेंबर रोजी घडलेल्या २८ लाखांच्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीने संपूर्ण परिसर हादरला होता. विश्वासाने शेजारणीकडे घराची चावी दिली असता घरात ठेवलेले सोने तीनेच चोरल्याची घटना उघडकीस आली आहे.

कामोठ्यातील सविता म्हसकर यांच्या घरातून सप्टेंबर महिन्यात २२ तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेले होते. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या चोरीच्या संशयाची सूई थेट शेजारी राहणाऱ्या आणि प्रतीक जेम्स सोसायटीच्या चेअरमन असलेल्या मोनिका दिघे यांच्याकडे वळली होती. मात्र, तेव्हा दिघे कुटुंबीयांचा आवाज ठाम आणि आवेशपूर्ण होता. आमच्यावर खोटे आरोप लावले जात आहेत. आम्ही पोलीस तपासात पूर्ण सहकार्य करत आहोत, असे मोठ्या आत्मविश्वासाने सांगत होते. या प्रकरणी मस्कर कुटुंबियांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडत त्यांनी मोनिका दिघेवर थेट आरोप केले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला. मोनिका दिघे यांचा पोलिसांनी कसून तपास सुरू केला. त्यात त्या दोषी आढळल्या. तब्बल दोन महिन्यानंतर पोलिसांनी आरोपी महिला मोनिका दिघे हिला ताब्यात घेतले असून तिच्याकडून २२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने देखील ताब्यात घेतले.

# शिक्षकांना मिळणार शिस्तीचे धडे

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

राज्यात काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेचे प्रकार समोर येत असून समाजात याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, सुरक्षित वातावरण आणि शिक्षकविद्यार्थी नातेसंबंध अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके आणि केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदांमध्ये 'सकारात्मक शिस्त' या विषयावर किमान ४५ मिनिटांचे विशेष सत्र आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हे सत्र डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येणार आहे. या मार्गदर्शन सत्रामध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा केली जाणार असून त्यामध्ये शारीरिक शिक्षेबाबत शिक्षण अधिकार अधिनियमातील तरतुदी व शिक्षकांची जबाबदारी, शिक्षेचे प्रकार व स्वरूप, शिक्षेचे परिणाम, शिक्षेचा मनावर व मेंदूवर होणारा परिणाम, विविध शैक्षणिक विचारवंत व त्यांचे सकारात्मक शिस्तीचे विचार, सकारात्मक शिस्त तत्वे व त्यांची अंमलबजावणी, संवाद सहकार्य व समुपदेशन यावर आधारित वर्ग व्यवस्थापन, योग्य शिस्तीचे मार्ग, सकारात्मक शिस्तीचे तंत्र व उपक्रम या शिक्षण परिषदेमध्ये सुलभन केले जाणार आहे.

# गुंड प्रवृत्तीच्या पर्यटकांमुळे श्रीवर्धन बदनाम

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरात सुट्टीच्या दिवशी पर्यटकांची मोठ्या प्रमाणात रेलचेल सुरू असते. पर्यटकांमुळेच येथील पर्यटन व्यवसायाला चालना मिळत आहे. श्रीवर्धनमध्ये बहुतांश पर्यटक हे कुटुंब वत्सल असतात. परंतु, काही गुंड प्रवृत्तीच्या पर्यटकांमुळे स्थानिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे श्रीवर्धन बदनामीच्या वाटेवर असल्याच्या चर्चा स्थानिकांमधून होत आहेत.

सध्या श्रीवर्धनमध्ये पर्यटक येण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे स्थानिकांनी आपल्या घराच्या परिसरात खाणावळ, चहा-नाश्ता व पाण्याची व्यवस्था करीत आपल्या उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त केले आहे. तसेच, आपल्या घरात होम स्टे, वातानुकूलित खोल्या उभारत पर्यटकांसाठी निवासाची उत्तम व्यवस्था केली आहे. त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. परंतु, या ठिकाणी येणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या पर्यटकांमुळे श्रीवर्धनचे नाव बदनामीच्या वाटेवर चालले आहे. त्यांच्याकडून सार्वजनिक ठिकाणी खुलेआम मद्यपान करणे, शहरातील अथवा किनाऱ्यावरील व्यावसायीकांना किरकोळ कारणावरून धक्काबुक्की करणे, तसेच रिसॉर्ट चालक-मालकाशी खोली भाड्यावरुन वादविवाद देखील करतात. काही महिन्यांपूर्वी हरिहरेश्वर येथे होम स्टे मालकाच्या बहिणीला मद्यपी पर्यटकांनी गाडी खाली चिरडून ठार मारल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर काही दिवसांसाठी श्रीवर्धन पोलीसांकडून पर्यटकांच्या वाहनांची तपासणी केंद्र उभारण्यात आली होती. परंतु, येथील अनेक रिसॉर्ट, होम स्टे चालक पर्यटकांची ओळख पटेल अशी कुठेही नोंद करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांनी आलेल्या पर्यटकांच्या सर्व नोंदी घेऊनच मुक्कामासाठी खोल्या द्याव्यात, अशी मागणी स्थानिक करीत आहेत.



दरम्यान, श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांनी, श्रीवर्धनसह परिसरातील हॉटेल, रिसॉर्ट चालक व मालकांना सुचना काही सुचना केल्या आहेत. त्यात सर्व नियम पाळून आपले व्यवसाय करा, नियमानुसार ज्या अटी घातल्या आहेत त्याप्रमाणे पर्यटकांचे ओळख पत्र घेण्यात यावे व त्याची नोंदणी रजिस्टर बुक मध्ये करण्यात यावी. त्यामुळे सर्वांनी पोलीस प्रशासनाला मदत करा, असे आवाहन केले आहे.

**पाठपुराव्यामुळे भरपाई देण्यास सुरुवात | जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आदेश**

# विमा कंपनी लागली कामाला

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांचा पाठपुरावा आणि जिल्हाधिकारी यांच्या दणक्याने विमा कंपनी तात्काळ कामाला लागली आहे. मंजूर झालेल्या भरपाईची रक्कम आठ दिवसांत देण्यास कंपनीने सुरुवात केल्याची माहिती चंद्रकांत मोकल यांनी दिली.

जागतिक हवामान बदलाचा (ग्लोबल वार्मिंग) परिणाम जाणवत असून वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. तापमान वाढ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, वादळे अशा आपत्तींमुळे आंब्याचे उत्पादन घटून त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना या आपत्तीतून दिलासादायक बाब म्हणजे आंबा फळपीक विमा योजना अर्थात शेतकऱ्यांचे झालेले नुकसान काही अंशी या योजनेतून भरुन निघते. २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षांसाठी रायगड जिल्ह्यासाठी युनिव्हर्सल सॉम्पो इन्शुरन्स कंपनी नेमून देण्यात आली. रायगडच्या शेतकऱ्यांना देखील अत्यल्प विमा भरपाई मंजूर झाली होती. मात्र, स्कायमेटकडील डाटाच्या आधारे ती कमी होती. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या भरपाईवर हरकत घेतली. रायगड जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी स्कायमेट कडून प्राप्त हवामानाच्या माहितीच्या आधारे पुन्हा तपासणी करुन अचूक विमा रक्कम निश्चित करावी असे पत्र कंपनीला व संचालक नियोजन व प्रक्रिया कृषी आयुक्तालय पुणे यांना दिले.



विमा भरपाई मिळावी म्हणून महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी कृषी आयुक्तालय व संबंधित यंत्रणाकडे पाठपुरावा केला. याची दखल घेत कृषी आयुक्तालयाच्या निर्देशानुसार कोकण विभागाचे कृषी सहसंचालक शिवाजी आमले यांनी दि.१७ ऑक्टोबरला ठाणे येथे सर्वसंबंधिताची बैठक आयोजित केली. या बैठकीमध्ये चंद्रकांत मोकल यांच्या सहीत सुप्रिया देशपांडे, राकेश जाधन, भरत साळुंखे, प्रफुल्ल खारपाटील, पंकज जवके आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्याय चंद्रकांत मोकल यांनी सहसंचालक कृषी यांच्या निदर्शनास आणून दिला. याची सहसंचालक कृषी यांनी दखल घेऊन जिल्हास्तरीय समितीची बैठक रायगडचे जिल्हाधिकारी यांनी घेऊन हा प्रश्न सोडविणे बाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना सूचना केल्या. जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी गुरूवारी (दि.२०) बैठक घेऊन सुचना दिल्या. कोणत्याही प्रकारची कसूर होता कामा नये, याची दक्षता घेण्याचे संबंधिताना जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले. चंद्रकांत मोकल यांच्या पाठपुराव्यामुळे आणि जिल्हाधिकारी यांच्या दणक्याने विमा कंपनी कामाला लागली. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई देण्यास सुरुवात केल्याची माहिती चंद्रकांत मोकल यांनी दिली.



# वडगाव-गुतीची वाडी रस्त्याची दुरवस्था

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील जिर्णे ग्रामपंचायत हद्दीतील महसुली गाव जिर्णे व या गावाच्या अंतर्गत येणाऱ्या आदिवासी वाड्यांना जोडणारा वडगाव जिर्णे हा रस्ता सुमारे ६० वर्ष प्रचलीत आहे. हा रस्ता पूर्णताः मातीचा असल्याने पावसाळ्यात पुर्णपणे वाहून जातो. पावसाळा संपल्यानंतर आदिवासी तरुण एकत्र येऊन श्रमदानातून या रस्त्याची दुरुस्ती करतात. पावसाळ्यात या रस्त्यावरुन ये-जा करणे कठीण होते. त्यामुळे जिर्णे विभागातील आदिवासींना पेण शहराकडे येण्यासाठी २४ किलोमीटरचा वळसा मारावा लागतो. हा रस्ता कायमस्वरुपी शासनाने केल्यास वडगाव ते जिर्णे अंतर फक्त साडेतीन किलामीटरचे असेल. वडगाव ते जिर्णे जिल्हा ग्रामीण रस्ता २०२४ मध्ये मंजूर करण्यात आला आहे. तो रस्ता तातडीने पूर्ण करावा, अशी मागणी जिर्णे विभागातील आदिवासी बांधवांनी केली आहे.

# शिक्षणातील भ्रष्टाचार

या देशात तेरा वर्षांपूर्वी भ्रष्टाचाराविरुध्द मोठे आंदोलन झाले. लोकपाल हवा म्हणून अण्णा हजारे यांनी उपोषण केले. भल्याभल्यांना वाटले की अंतिम लढाई आहे. ती जिंकली की भ्रष्टाचार संपणार. प्रत्यक्षात इतकेच झाले की भाजपने याचा फायदा उठवला. नरेंद्र मोदी सत्तेत आले आणि अण्णा हजारे शांतपणे राळेगणमध्ये झोपायला गेले. आता अण्णा एकाही भ्रष्टाचाराबद्दल चकार शब्द उच्चारत नाहीत आणि मोदी तर अण्णांच्या पत्राला उत्तरही देत नाहीत. याची पुन्हा आठवण करून देण्याचे कारण म्हणजे शिक्षण क्षेत्रात अलिकडेच उघड झालेले दोन गंभीर घोटाळे. पहिली भानगड ही वैद्यकीय महाविद्यालयांच्या संदर्भातील आहे. केंद्रीय वैद्यकीय आयुक्तालयामार्फत या महाविद्यालयांची दरवर्षी नियमित तपासणी केली जाते. वैद्यकीय महाविद्यालयाला एक रुग्णालय जोडलेले असावे लागते. तेथील रुग्णांची तपासणी करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव दिला जातो. याखेरीज मानवी शरीराचे काम कसे चालते हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी मृतदेह फाडून पाहण्याची सोय असावी लागते. ग्रंथालय व प्रयोगशाळा लागतात. पुरेशा प्रमाणात शिक्षक असावे लागतात. ही तपासणी समाधानकारक झाली तरच वैद्यकीय महाविद्यालय चालू ठेवण्यासाठी परवानगी मिळू शकते. १९९० च्या नंतर आपल्याकडे खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचे पेव फुटले. अलिकडच्या काळात तर धड स्वतःची इमारत नाही, जागा नाही, शिक्षक नाहीत अशा स्थितीतही वैद्यकीय महाविद्यालये सुरु झाली आहेत. यांचे बिंग अधूनमधून फुटत असते. त्यावर उपाय म्हणजे याच्या तपासणीस येणाऱ्या समितीला मॅनेज करणे. म्हणजे एक तर या समितीतील सदस्यांना थेट पैसे देऊ करणे. पण शेवटी जाग्यावरच काही सुविधा नसतील तर त्या आहेत असा अहवाल देणे कठीणच असते. यासाठी तपासणी समिती येईल तेव्हा आधी अशा सुविधांचे नाटक उभे करणे. आजवर असे प्रकार आपण सिनेमातच पाहिलेले असतात. पण हे प्रत्यक्ष होत होते. या विशिष्ट भ्रष्टाचाराच्या प्रकरणात समितीचा दौरा कधी आहे याची आगाऊ माहिती मिळवण्याची व्यवस्था केली गेली होती व नाटक केले जात होते.

## बडी मंडळी बडी भानगड

यासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयुक्तालयातूनच माहिती चोरण्याची व्यवस्था झाली होती. तपासणीस येणाऱ्या समितीच्या दौऱ्याचा कार्यक्रम, ती कोणत्या गोष्टींची कशा रीतीने तपासणी करणार आहे याचे मुद्दे इत्यादी संबंधितांना कळवले जात होते. पण हा काही भुरट्या चोरीचा प्रकार नव्हता. या भानगडीमध्ये अनेक नामांकित वैद्यकीय महाविद्यालयांचे डीनसह ३६ लोकांचा समावेश आहे. कहर म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस अर्थात टिस या मुंबईच्या प्रतिष्ठित संस्थेचे कुलपती डी. पी. सिंग यांचेही नाव सीबीआयने दाखल केलेल्या फिर्यादीमध्ये आहे. हे आरोप सिध्द होणे ही पुढची गोष्ट आहे. पण देशातील विद्यापीठांचे नियंत्रण करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माजी अध्यक्षांचे नाव अशा भ्रष्टाचाराच्या प्रकरणात यावे हे धक्कादायक आहे. सिंग यांना मिळालेल्या नियुक्त्या पाहता ते सध्याच्या मोदी सरकारच्या जवळचे असणार यात शंका नाही. टिसमधील डाव्या विद्यार्थ्यांचा प्रभाव मोडून काढण्यासाठी सरकार सध्या जोरात प्रयत्नशील आहे. ते पाहता सिंग यांची नियुक्ती तेथे हेतूतः झाली असणार. तर सरकारच्या इतक्या मर्जीतल्या माणसावर सीबीआय काही ठोस पुरावे असल्याखेरीज आरोप करू धजणार नाही. महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, बिहारसह अनेक राज्यांमधील वैद्यकीय महाविद्यालये पैसे देऊन खोटे अहवाल मिळवण्याच्या या भानगडीत होती. तपासणी समिती येईल तेव्हा बनावट शिक्षक उभे करणे, खोटी इस्पितळे उभारून रुग्णांवर उपचार व तपासणी चालू असल्याचे दाखवणे, शिक्षक व इतरांच्या उपस्थितीच्या खोट्या बायोमेट्रिक नोंदी तयार करणे असे अनेक प्रकार या भानगडीदरम्यान घडले आहेत. हे घडवून आणण्यासाठी खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचे चालक करोडो रुपयांची लाच देत होते. अर्थातच हे पैसे नंतर विद्यार्थ्यांच्या फीमधून वसूल केले जात होते. यातील लाच प्रकरण व त्यातील सिंग यांच्यासारख्या उच्चपदस्थांचा कथित सहभाग ही लाजिरवाणी बाब आहेच. मात्र या महाविद्यालयात शिकून बाहेर पडणारे विद्यार्थी डॉक्टरकी करण्याच्या लायकीचे असतील का आणि ते जिथे कुठे उपचार करतील तेथील रुग्णांचे काय होत असेल हा खरा गंभीर प्रश्न आहे.

## टीईटीतील पेपरफुटी

भारतातील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांचा दर्जा पूर्वीच्या काळी उच्च प्रतीचा होता. यातून शिकून गेलेले कित्येक डॉक्टरांनी अमेरिका, इंग्लंडमध्ये प्रचंड नाव व पैसा मिळवला आहे. आपल्या देशात अजूनही सरकारी संस्थेत शिक्षण घेतले असेल तरच तो बरा डॉक्टर असेल असे मानतात. याचे कारण ही महाविद्यालये सरकारी रुग्णालयांशी जोडलेली असतात. जसे मुंबईचे केईएम किंवा पुण्याचे ससून इत्यादी. त्यामुळे तेथे विद्यार्थी डॉक्टरांना चांगले शिक्षण व अनुभव मिळतो असे गृहित असते. पण सर्व काही पैशाने विकत मिळते अशा मनोवृत्तीच्या या आधुनिक काळात या डॉक्टरकीची पदवीही पैशांच्या बदल्यात दिली व घेतली जाऊ लागली आहे. या तथाकथित व्यवहाराची काळी बाजू सीबीआयच्या या प्रकरणाने उघड झाली आहे. भारतीय वैद्यकीय शिक्षणाच्या एकूण स्थितीविषयी ती चिंता निर्माण करणारी आहे. न खाऊंगा न खाने दूंगा हे म्हणणे मोदी सरकारने इथे तरी खरे करावे व या प्रकरणाचा वेगाने तपास करून सर्वांना जरब होईल अशी शिक्षा करावी. तरच उर्वरित भानगडबाजांना आळा बसेल व भारतीय वैद्यकीय शिक्षणाची पत सांभाळली जाईल. याच दरम्यान दुसरा जो घोटाळा बाहेर आला तो टीईटीच्या परिक्षेसंबंधीचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने काही वर्षांपासून सेवेतील शिक्षकांना टीईटी म्हणजेच शिक्षकांच्या ज्ञानाची तपासणी करणारी परिक्षा अनिवार्य केली आहे. महाराष्ट्र सरकारने नव्या शिक्षकांच्या नेमणुका करताना डीएड किंवा बीएडच्या जोडीने टीईटी परिक्षा पास असणे सक्तीचे केले आहे. त्यातील गुणवत्ता यादीनुसार नव्या नियुक्त्या केल्या जातात. तर सेवेतील शिक्षकांची पगारवाढ, श्रेणीवाढ ही टप्प्याटप्प्याने टीईटीतील यशाशी जोडली जायची आहे. यामुळे टीईटी परिक्षेला सध्या भलतेच महत्व आले आहे. यंदा २३ नोव्हेंबरला राज्यात ही परिक्षा झाली. त्या परिक्षेआधीच तिचा पेपर फोडण्याचे एक रॅकेट उघडकीस आले. प्रत्येकी तीन लाख रुपये घेऊन यातील प्रश्नपत्रिका उमेदवारांना दिली जात होती. कोल्हापुरातील मुरगुड, कागल भागात पोलिसांनी या रॅकेटमधील काही लोकांना अटक केली. नंतर यातला मुख्य आरोपी महेश गायकवाड हा कराडचा असून त्याचे व इतर राज्यातील अशा भानगडबाज लोकांचे संबंध असल्याचे उघड झाले. जे शिक्षक उद्याचे नागरिक घडवणार तेच असला भ्रष्टाचार करीत असतील तर या देशाचे भवितव्य अंधारलेले आहे असे म्हणावे लागेल. याही प्रकरणाचा जलदगती तपास करून आरोपींना कडक शिक्षा व इतरांना जरब बसवली जाणे आवश्यक आहे.

विचार

# पर्यटनाचा वाढता टक्का, शुल्कवाढीवर उतारा

***लक्षवेधी अर्थवार्तांच्या यादीमध्ये सरत्या आठवड्यात काही ठळक बातम्या पहायला मिळाल्या. त्यात चीनी नागरिकांना भारतीय पर्यटनाचे दरवाजे खुले झाल्याची बातमी दखलपात्र ठरली. त्याच वेळी ट्रम्प टॅरिफनंतरही भारताच्या निर्यातीत वाढ झाल्याचे आढळून आले. ही एक महत्वाची बातमी ठरली. दरम्यान, येत्या काळात औषधे महागणार असल्याची चर्चाही तरंग उमटवून गेली.***



महेश देशपांडे

लक्षवेधी अर्थवार्तांच्या यादीमध्ये सरत्या आठवड्यात काही ठळक बातम्या पहायला मिळाल्या. त्यात चीनी नागरिकांना भारतीय पर्यटनाचे दरवाजे खुले झाल्याची बातमी दखलपात्र ठरली. त्याच वेळी ट्रम्प टॅरिफनंतरही भारताच्या निर्यातीत वाढ झाल्याचे आढळून आले. ही एक महत्वाची बातमी ठरली. दरम्यान, येत्या काळात औषधे महागणार असल्याची चर्चाही तरंग उमटवून गेली.

भारताने चीनी नागरिकांसाठी पर्यटक व्हिसा पुन्हा सुरू केला. अमेरिका व्यापार करारावर सहमत होण्याच्या जवळ पोहोचल्याचे वृत्त आहे. यामुळे आयात शुल्क दर कमी होऊन भारतीय निर्यातदारांना मोठा दिलासा मिळेल आणि त्यांना अमेरिकन बाजारपेठेत स्पर्धात्मकता टिकवून ठेवता येईल अशी अपेक्षा आहे. दरम्यान, भारताने अमेरिकेला पर्याय म्हणून इतर देशांशी संबंध मजबूत करण्यावरही भर दिला आहे. डोकलाम वादानंतर चीनशी संबंध सामान्य करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. भारताने अलीकडेच चीनी पर्यटकांसाठी आपले पर्यटन दरवाजे उघडले. चीनी नागरिक आता जगभरातील भारतीय मिशन आणि वाणिज्य दूतावासांद्वारे भारतीय पर्यटन व्हिसासाठी अर्ज करू शकतील. या वर्षी जुलैमध्ये भारताने चीनी नागरिकांना पर्यटक व्हिसा देणे पुन्हा सुरू केले.

पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर लष्करी संघर्षानंतर मे २०२० मध्ये ही सुविधा निलंबित करण्यात आली होती. अलिकडेच जगभरातील भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावासांनी चीनी नागरिकांना पर्यटक व्हिसा देणे सुरू केले. त्यानंतर, बीजिंगमधील भारतीय दूतावास आणि शांघाय, ग्वांगझू आणि हाँगकाँगमधील वाणिज्य दूतावासांमध्ये अर्ज स्वीकारले जाऊ लागले. गेल्या काही महिन्यांमध्ये भारत आणि चीन यांनी संबंध स्थिर करण्यासाठी आणि पुनरुज्जीवित करण्यासाठी अनेक लोककेंद्रित उपाययोजनांवर सहमती दर्शवली आहे. यामध्ये कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करणे, थेट उड्डाणे पुन्हा सुरू करणे, राजनैतिक संबंधांच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त उत्सव साजरा करणे आणि व्हिसा सुविधा सुलभ करणे यांचा समावेश आहे. ऑक्टोबरमध्ये दोन्ही देशांमधील थेट उड्डाणेदेखील पुन्हा सुरू झाली.

याच सुमारास भारत-अमेरिका व्यापार अनेक अडचणींना सामोरा जात महत्वाच्या वळणावर पोहोचला आहे. ट्रंप यांच्या मनमानी आयात शुल्कासमोर देशाच्या निर्यातीचा डोलारा कोसळेल, हा अंदाज चुकीचा ठरला आहे. स्टेट बँक रिसर्चच्या मते, जागतिक बाजारपेठेत अस्थिरता असूनही भारताची निर्यात स्थिर राहिली आहे. अहवालात म्हटले आहे, की आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान निर्यात २२० अब्ज डॉलर्सवर पोहोचली. गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील २१४ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निर्यात झाली होती. आता त्यात २.९ टक्के वाढ झाली आहे. अमेरिकेतील निर्यातही १३ टक्क्यांनी वाढून ४५ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. तथापि, सप्टेंबरमध्ये निर्यात सुमारे १२ टक्क्यांनी घटली. अमेरिका ही भारतासाठी एक प्रमुख बाजारपेठ राहिली असली, तरी जुलै २०२५ पासून सप्टेंबरमध्ये भारताच्या एकूण निर्यातीत त्याचा वाटा १५ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या सागरी उत्पादनांच्या निर्यातीमध्ये २०२५ मध्ये २० टक्क्यांवरून १५ टक्के इतकी घट झाली तर मौल्यवान धातूंमधील वाटा ३७ टक्क्यांवरून सहा टक्क्यांपर्यंत घसरला. एप्रिल-सप्टेंबर या कालावधीमध्ये सागरी उत्पादने आणि तयार कापूस, कपडे या दोन्हींमध्ये वाढ नोंदवली गेली. भारताचे निर्यातक्षेत्र भौगोलिकदृष्ट्या अधिक वैविध्यपूर्ण झाले आहे. संयुक्त अरब अमिराती, चीन, व्हिएतनाम, जपान, हाँगकाँग, बांगलादेश, श्रीलंका आणि नायजेरियासारख्या देशांनी अनेक उत्पादन गटांमध्ये वाढलेला वाटा पाहिला आहे.स्टेट बँक रिसर्च सुचवते, की यापैकी काही भारतीय वस्तूंच्या अप्रत्यक्ष आयातीचे संकेत असू शकतात, कारण अमेरिकेतून होणाऱ्या मौल्यवान दगडांच्या आयातीमध्ये ऑस्ट्रेलियाचा वाटा दोन टक्क्यांवरून नऊ टक्क्यांपर्यंत वाढला आहे, तर हाँगकाँगचा वाटा एक टक्क्यावरून दोन टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ट्रम्प प्रशासनाच्या काळात भारत उच्च अमेरिकन शुल्काशी झुंजत आहे. त्याचा कापड, दागिने आणि सीफूड, विशेषतः कोळंबीवर परिणाम झाला आहे. निर्यातदारांना पाठिंबा देण्यासाठी, सरकारने सुमारे ४५ हजार कोटींची मदत मंजूर केली आहे. त्यात वीस हजार कोटींची क्रेडिट गॅरंटी समाविष्ट आहे. जागतिक आर्थिक उलथापालथीच्या काळात डॉलरच्या तुलनेत रुपयादेखील दबावाखाली येत ८९.४९ पर्यंत घसरला. भारताची राजकोषीय तूट २०२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये जीडीपीच्या ०.२ टक्क्यांपर्यंत कमी झाली. सेवा निर्यात आणि रेमिटन्समुळे त्यात सुधारणा झाली आहे. पुढील दोन तिमाहींमध्ये तूट थोडीशी वाढेल आणि नंतर आर्थिक वर्षाच्या अखेरीस सकारात्मक होईल अशी एसबीआय रिसर्चला अपेक्षा आहे. 'एसबीआय रिसर्च'चा अंदाज आहे, की संपूर्ण वर्षातील तूट जीडीपीच्या १.०-१.३ टक्के असेल आणि देयकांच्या संतुलनातील तफावत १० अब्ज डॉलर्सपर्यंत असेल.

आता आणखी एक महत्वाची बातमी. देशात जीएसटी दर कमी केल्यानंतर, सरकारने आता औषध क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालावर, म्हणजेच औषधी उत्पादनांवर किमान आयात किंमत (एमआयपी) लादण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे देशात औषधांच्या किमती वाढू शकतात. अनेक औषध उद्योगतज्ञांनी या निर्णयावर चिंता व्यक्त केली आहे. त्यांचे म्हणणे आहे, की काही आवश्यक कच्च्या मालावर एमआयपी लादल्याने एपीआय (सक्रिय औषधी घटक) आणि एकूणच औषधांची किंमत वाढेल. खर्च वाढल्याचा थेट परिणाम रुग्णांवर होऊन औषधे महाग होतील. या प्रस्तावाचे उद्दिष्ट चीनसारख्या देशांतर्गत उत्पादकांच्या शाश्वततेवर परिणाम करु शकते. तथापि, अनेक वैद्यकीय तज्ज्ञ या हालचालीला भारतीय औषध क्षेत्रासाठी हानिकारक मानत आहेत. सरकार सध्या पेनिसिलिन-जी, ६एपीए आणि अमोक्सिसिलिनवर एमआयपी लादण्याचा विचार करत आहे. उद्योग अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, की अँटीबायोटिक्समध्ये वापरल्या जाणाऱ्या या आवश्यक घटकांवर एमआयपी लादल्याने एमएसएमई क्षेत्रावर मोठा परिणाम होईल. अहवालांनुसार, याचा परिणाम दहा हजारांहून अधिक एमएसएमई युनिट्सवर होऊ शकतो. त्यामुळे अनेकांना उद्योग बंद करावे लागू शकते. परिणामी सुमारे दोन लाख लोकांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. सरकारने सप्टेंबरमध्ये ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत एटीएस-८ आयातीसाठी प्रति किलो १११ ची किमान किंमत निश्चित केली. एका महिन्यानंतर, सरकारने पुढील वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत सल्फाडायझिनसाठी प्रति किलो १,१७४ रुपये एमआयपी जाहीर केला. काही तज्ज्ञ सरकारच्या या पावलाला आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक मजबूत संकेत मानतात. कारण भारतीय औषध उद्योग कच्च्या मालासाठी चीनवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. २०२० मध्ये, सरकारने हे अवलंबित्व कमी करण्यासाठी उत्पादन-लिंक्ड इन्सेन्टिव्ह (पीएलआय) योजना सुरू केली. त्यामुळे देशांतर्गत कंपन्यांना आवश्यक कच्च्या मालाच्या उत्पादनात गुंतवणूक वाढवण्यास प्रोत्साहन मिळाले. उद्योगतज्ज्ञांचे म्हणणे आहे, की 'पीएलआय' योजना ६एपीए किंवा अमोक्सिसिलिनच्या किमती नियंत्रित करण्यासाठी तयार केली नव्हती. आता 'एमआयपी' वापरल्यास 'पीएलआय' प्राप्त करणाऱ्या कंपन्या योजनेच्या व्याप्तीबाहेर अतिरिक्त संरक्षण किंवा फायदे शोधतात, असा आक्षेप घेतला जाऊ शकतो.

# निवडणूक काळात तळीरामांची 'मद्य' कसोटी



वैष्णवी वाडकर

रायगड जिल्ह्यात डिसेंबर महिन्याच्या पहिल्या तीन दिवसांसाठी ड्राय डे जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे या तीन दिवसांत मद्यप्रेमींची मोठी कसोटी लागणार असल्याची चर्चा सध्या सुरु आहे. १ डिसेंबर ते ३ डिसेंबर असे सलग तीन दिवस संपूर्ण जिल्ह्यात ड्राय डे जाहीर करण्यात आला आहे. नगरपरिषद, नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हा आदेश दिला असून कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणूक काळात मद्यविक्रीवर निर्बंध लावणे हा महत्वाचा निर्णय असला तरी तीन दिवस सलग मद्यविक्री बंद राहणार असल्याने मद्यप्रेमींमध्ये खळबळ उडाली आहे. अनेकांनी तर शनिवारपासूनच दुकाने उघडी असताना दुकानात गर्दी करून साठा करण्यास सुरुवात केली असल्याचे मद्यविक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत व माथेरान नगरपरिषदांच्या हद्दीत एकूण ६२९ उमेदवार रिंगणात आहेत. नगराध्यक्षपदासाठी ३४ आणि नगरसेवकपदासाठी ५९५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. १०७ प्रभागांमध्ये २ लाख ३७ हजार ५०३ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील विविध पक्षातील उमेदवारांनी गृहभेटीतून जोरदार प्रचारला सुरुवात केली आहे. २ डिसेंबरला मतदान होणार असून ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. या काळात कोणीही दारु पिऊन गोंधळ करु नये व गैरप्रकार किंवा कायदा-सुव्यवस्था बिघडू नये यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. या तीन दिवसांत मद्य विक्री, वाहतूक आणि निर्मितीदेखील बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कालावधीत किरकोळ दारु विक्रेत्यांपासून ताडीमाडी विक्री करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग त्याचबरोबर पोलीस प्रशासन डोळ्यात तेल घालून काम करत आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असून महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ च्या कलम ५४ व ५६ नुसार परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क व पोलिसांच्या संयुक्त कारवाईसाठी विशेष पथके नेमण्यात आली असून रविंद्र कोले यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी तपासणी सुरू आहे. ऑक्टोबर महिन्यातच रायगडमध्ये ४२ लाख ५२ हजार बल्क लिटर दारूची विक्री झाली असून त्यात देशी दारूची ८.९६ लाख, विदेशी दारूची ७.९६ लाख आणि बिअरची तब्बल २५.५९ लाख बल्क लिटर विक्री झाली आहे. एवढ्या प्रचंड विक्रीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक काळातील नियंत्रणाचे महत्त्व अधिक वाढते. शिवाय ऑक्टोबर महिन्यात २९९ जणांविरोधात ३१५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचबरोबर ९० लाख ५५ हजार ८१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यात ३४ वाहनांचा समावेश असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे निवडणूक काळात कारवाई कडकच होणार हे स्पष्ट दिसून येत आहे.

दरम्यान, निवडणूकिच्या दिवशी म्हणजे २ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील आठवडा बाजारही बंद राहणार आहे. मतदारांना मतदानासाठी सुविधा उपलब्ध व्हावी व कोणताही गोंधळ होऊ नये यासाठी हा निर्णय घेतल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. निवडणूक हा लोकशाहीचा महत्वाचा भाग असल्यामुळे कायदा-सुव्यवस्था व शांतता टिकून राहणे आवश्यक आहे. त्यामुळे बाजारपेठा, मद्यदुकाने यांवर असलेली बंदी निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक असणार आहे. मात्र, या तिन दिवसांच्या ड्राय डे मुळे तळीरामांच्या घशाला कोरडेपणा जाणवणार आहे. काहींनी आधीच दारूचा स्टॉकची तयारी करून ठेवली आहे; परंतु, ज्यांना उशिरा आठवले त्यांना आता तीन दिवस पाण्यावरच तहान भागवावी लागणार असल्याचे बोलले जात आहे. काही नागरिक मात्र प्रशासनाच्या निर्णयाचा पूर्णपणे आदर करत आहेत. निवडणुकीचा काळ शांततेत पार पडला पाहिजे आणि दारूमुळे गोंधळ किंवा भांडणे होऊ नयेत व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी हे नियम आवश्यक असल्याचे मत अनेक नागरिकांकडून व्यक्त करण्यात आले आहे. त्यामुळे देशाचा सुजाण नागरिक म्हणून सार्वजनिक सुरक्षेसाठी काही दिवसांचा संयम पाळणे योग्य असल्याचेही अनेकजण सांगत आहेत. निवडणुकीची शिस्त आणि प्रशासनाच्या कडक भूमिकेमुळे मद्यप्रेमींची खरी परीक्षा बघितली जाणार, अशी चर्चा सध्या रंगत आहे.

लोकसंसद

## नेपाळची पुन्हा आगळीक

नेपाळच्या मध्यवर्ती बँकेने १०० रुपयांच्या नवीन नोटेवर छापलेल्या नकाशावर भारताचे कालापानी, लिपुलेख आणि लिंपियाधुरा हे भूभाग नेपाळचा भाग म्हणून दाखविल्यामुळे भारत-नेपाळ राजनैतिक संबंधांमध्ये पुन्हा एकदा दुरावा निर्माण झाला आहे. यापूर्वी कोरोना काळात मे २०२० मध्ये नेपाळने असा वादग्रस्त नकाशा प्रसिद्ध करून आगळीक केली होती. भारताने नेपाळच्या या एकतर्फी कृतीवर आक्षेप नोंदवला असून नेपाळने भारताच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करावा असे सुनावले आहे. एकीकडे भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमांवरून पाकिस्तान, बांगलादेश, चीन या देशांशी वादविवाद सुरु असताना आता नेपाळनेही भारतासोबत सीमावाद सुरु केला आहे. या सीमावादाला २०० वर्षांची पार्श्वभूमी असून बिहारमधील पूर्व चंपारण जिल्ह्यामधील सुगौली गावात ब्रिटिश काळात नेपाळबरोबर झालेल्या आणि ४ मार्च १८१६ पासून लागू झालेल्या 'सुगौली करारा'नुसार महाकाली नदीला भारत-नेपाळची आंतरराष्ट्रीय सीमा म्हणून निश्चित केले गेले होते. मात्र बदलत्या काळात नेपाळची चीनबरोबर जवळीक वाढली असून चीनकडून नेपाळला भारताविरुद्ध भडकविण्याचे कारस्थान सुरु आहे. भारताने या संदर्भात नेपाळला कडक इशारा दिला असून भारतीय भूभागांवरचा नेपाळचा दावा कदापि स्वीकारला जाणार नाही अशी समज दिली आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## अफवांमध्ये हरवलेली संवेदनशीलता


सध्या सोशल मीडिया आणि काही वृत्तवाहिन्यांची बातमी देण्यातील बेफाम घाई खूपच त्रासदायक ठरते आहे. दिवंगत धर्मेंद्र रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांच्या मृत्यूच्या अफवा पसरल्या आणि काहींनी तर श्रद्धांजलीपर पोस्टही टाकल्या; नंतर कळले की ही माहिती चुकीची होती. अलिकडेच स्मृती मंधानाचे लग्न पुढे ढकलले एवढी साधी माहिती असताना तिच्या नवऱ्याची कथित प्रेमप्रकरणे अशा उथळ बातम्या रंगवून पसरवण्यात काही माध्यमांना कसला आनंद मिळतो समजत नाही; संबंधित व्यक्तींना आणि त्यांच्या कुटुंबियांना होणारा मानसिक त्रास हे ध्यानातच घेतले जात नाही. आज राजकारण असो की चित्रपटसृष्टी'ब्रेकिंग' देण्याच्या स्पर्धेत 'बरोबर बातमी देणे' हा मूलभूत नियम बाजूला पडतो आणि अपूर्ण किंवा अफवांवर आधारित माहिती क्षणात पसरवली जाते. अशावेळी माध्यमांनी थोडा संयम, सत्यता आणि मानवी दृष्टी ठेवणे गरजेचे आहे.

दीपक काशिराम गुंडये, वरळी.

दिनविशेष

# जागतिक एड्स दिवस

जगभरात एड्स या आजाराबाबत लोकांमध्ये जागरुकता पसरवण्यासाठी दरवर्षी १ डिसेंबर रोजी वर्ल्ड एड्स डे साजरा करण्यात येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या एड्स ग्लोबल कार्यक्रमात काम करणाऱ्या थॉमस नेट्टर आणि जेम्स डब्ल्यू यांनी जागतिक एड्स दिवस साजरा करण्याचा विचार १९८७ मध्ये मांडला होता. त्यानंतर १९८८ पासून १ डिसेंबर रोजी जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात येतो. एड्स हा असा आजार आहे, ज्यांच्यावर अद्याप कोणताही प्रभावी उपचार वैज्ञानिकांना सापडलेला नाही. यापासून बचाव करणं हा या आजारावरील एकमेव उपचार आहे. हा आजार ह्यूमन इम्युनो डेफिशियन्स व्हायरसच्या संसर्गामुळे होतो. एचआयव्हीपासून बचाव करण्यासाठी जागरुकता अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीला इंजेक्शन देण्यासाठी वापरलेली सुई पुन्हा वापरु नये. मजागतिक एड्स दिनफ साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश प्रत्येक वयोगटातील लोकांना एचआयव्ही एड्समुळे पसरलेल्या संसर्गाबद्दल प्रबोधन करणे हा आहे. एड्स ही आज जगातील सर्वात मोठी आरोग्य समस्या आहे. कारण यावर अद्याप कोणतीही लस उपलब्ध नाही. २०२१ मधील युनिसेफच्या अहवालानुसार, जगभरात ३६.९ दशलक्ष लोक एचआयव्हीचे बळी ठरले आहेत. तर भारत सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात एचआयव्ही रुग्णांची संख्या सुमारे २.१ दशलक्ष आहे. एचआयव्ही हा एक गंभीर आजार आहे जो एका प्रकारच्या प्राणघातक संसर्गामुळे होतो. एड्सचे पूर्ण नाव 'अक्वायर्ड इम्यून डेफिशियन्सी सिंड्रोम आहे. हा एक प्रकारचा विषाणू आहे, ज्याचे नाव एचआयव्ही ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस आहे. या आजारात संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीवर हा व्हायरस हल्ला करतो. त्यामुळे शरीर सामान्य आजारांशीही लढण्यास असमर्थ ठरते. विशेष म्हणजे हा आजार तीन टप्प्यात होतो (प्राथमिक अवस्था, वैद्यकीय विलंब आणि एड्स). जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने आपल्याला एचआयव्ही, एड्स या विषयांवर जागरुकता निर्माण करण्याची संधी मिळते. एचआयव्ही संक्रमित झालेल्या रूग्णांना सहानुभूती दाखवण्याची आणि या आजाराशी लढण्यासाठी एकत्र येण्याची संधी या दिनानिमित्त मिळते.या दिवशी वेगवेगळे कार्यक्रम , सेमिनार आणि जागरूकता अभियान यांचे आयोजन केले जाते. हा दिवस साजरा करण्याची सुरुवात १९८८ मध्ये झाली होती. जाणून घेऊयात एचआयव्ही आणि एड्सशी संबंधित काही महत्त्वाच्या गोष्टींविषयी.



एचआयव्ही हा एक असा व्हायरस आहे, जे शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करतात. एड्स हा एचआयव्ही संक्रमणाची सर्वात शेवटचा टप्पा आहे. जेव्हा एचआयव्ही आपल्या शरीरात प्रवेश करतो. तेव्हा हा टी-सेल्स-ला नाहीसा करू लागतो. टी-सेल्स शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीचा एक महत्त्वाचा भाग आहेत. जेव्हा टी-सेल्सची संख्या खूप कमी होते तेव्हा शरीरातील शरीर एखाद्या साध्या आजाराविरूद्ध लढण्यासाठीही असमर्थ होतं. ज्यामुळे व्यक्तीचा मृत्यू ओढवू शकतो. एचआयव्ही इन्फेक्शनच्या सुरूवातीच्या काही टप्प्यांमध्ये आपल्याला फार लक्षणे दिसत नाहीत. काही लोकांना हलका ताप, घशात खवखव, थकवा, न्यूमोनिया ,तोंड येणे अशा समस्या जाणवतात. खरंतर ही लक्षणे काही आठवड्यांनंतर आपोआप गायबही होतात.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१ डिसेंबर**

१) श्री.धैर्यशिल दादासाहेब डफळे माणिग बाग, अलिबाग १-१२-१९४५
२)श्री.राजाराम मोतीराम डबरी नागडोंगरी, अलिबाग १-१२-१९५१
३)श्री.प्रकाश देविदास सराफ म्हाडा कॉलनी, अलिबाग १-१२-१९५०
४)श्री.केशव धाकू पाटील मु.मुळे, अलिबाग १-१२-१९५१
५)श्रीम.शुभांगी दिलीप शिंदे कामात-आळी, अलिबाग १-१२-१९५४
६) श्री.जयवंत वामन चेवले बाजारपेठ, अलिबाग १-१२-१९५४



## राजीवडा येथे घराला आग

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

रत्नागिरी शहरातील राजीवडा येथे एका घराला भीषण आग लागली. ही आगीची घटना शनिवारी (दि.२९)सायंकाळनंतर घडली. या घटनेमुळे राजवाडा परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती रत्नागिरी नगर परिषदेला कळताच अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर त्यांनी आग विझविण्यास सुरूवात केली. अथक प्रयत्नांनंतर त्यांना आगीवर नियंत्रण मिळविण्यास यश आले. या संदर्भात हाती आलेल्या वृत्तानुसार येथील काद्री यांच्या घराला आग लागल्याचे समजते. आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही, मात्र शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागण्याची शक्यता नागरिकांनी वर्तवली आहे.

# उड्डाणपुलाच्या कामात सुरक्षेकडे दुर्लक्ष

## कामगारांसह पुलाखालून जाणारे प्रवासी असुरक्षित

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गावरील चिपळूण येथे उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. येथे लहान-मोठे अनेक अपघात झाले असताना कामगार आणि प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. त्यामुळे पुलाखालून प्रवास करणारे प्रवासी आणि पुलावर काम करणारे कामगार दोघेही असुरक्षित आहेत.



बहादूरशेख नाक्यापासून प्रांताधिकारी कार्यालयापर्यंत उड्डाणपुल उभारण्याचे काम सुरू आहे. यापूर्वी बहादूरशेख नाका येथे गर्डर कोसळले होते. त्यानंतर पुलाचे नवीन डिझाईन करून चाळीस मीटरवजी वीस मीटरवर नवीन पीलर टाकण्याचे ठरले. पूर्वी उभारलेल्या पीलरच्या वरचा भाग तोडत असताना कामगार पडून जखमी झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर लोखंडी रॉड खाली पडून पादचारी जखमी झाल्याची घटना घडली होती. अशा अनेक घटना घडून सुद्धा संबंधित ठेकेदार तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण शासनाच्या कामगार कल्याण विभागाच्या कायद्यांना पायदळी तुडवत असल्याचे दिसते.

उड्डाणपुलाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी कधी लोखंडी सळी कोसळते. कधी पत्रा कोसळतो तर कधी अन्य साहित्य वरून खाली पडते. सुदैवाने त्यात गंभीर जखमी होण्याचे प्रकार अलिकडे झालेले नाही. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून २४ तास वाहतूक सुरू असते. त्यामुळे सेवा रस्त्यावर अपघात होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. डीबीजे महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच या भागातील प्रवासी येथून पायी चालत ये-जा करीत असतात. अनेकवेळा रस्त्याच्या बाजूला रिक्षा उभ्या केल्या जातात. महामार्गाच्या दोन्ही बाजूने काही हॉटेल आणि पेट्रोल पंप आहेत. येथे येणाऱ्या वाहन चालकांना तसेच पर्यटकाची सुरक्षाही धोक्यात आहे.

उड्डाणपुलाच्या कामावर सुमारे साठ कामगार कार्यरत आहेत. त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, हातमोजे, सेफ्टी शुज देणे गरजेचे आहे. त्याकडे कंपनीने दुर्लक्ष केले आहे. पुलाच्या खांबाचे काम करत असताना कामगार असुरक्षितपणे पळीवर किंवा लोखंडी गजावर उभे राहुन आपला जीव धोक्यात घालून काम करताना दिसतात. त्यामुळे अपघात होण्याचा धोका आहे. कामगार ज्या ठिकाणी काम करणार आहे त्याठिकाणी सुरक्षिततेसाठी जाळ्या बांधणे गरजेचे आहे. त्या मोजक्या ठिकाणी बांधलेल्या आहेत.

> **उड्डाण पुलाच्या ठिकाणी काम करणारे कामगार खासगी एजन्सीचे आहेत. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना केल्या पाहिजेत. अशा सूचना आम्ही एजन्सीला दिल्या आहेत. त्यांचा वीमा उत्तरवण्याची सूचनाही केली आहे. उड्डाण पुलाचे काम करताना कोणताही अपघात होणार नाही याची खबरदारी आम्ही घेत आहेत. अनेकवेळा रात्री कामाला प्राधान्य देतो कारण रात्री वाहतूक कमी असते. अपघात होणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत.**
>
> **– नजीब मुल्ला, सहाय्यक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग चिपळूण**

संबंधित मजुर हे परप्रांतीय असल्याने त्यांच्याकडून याबाबत कोणताही आवाज उठविला जात नाही.

## विहिरीमध्ये आढळला सडलेल्या अवस्थेतील कोल्हा

**| गुहागर| प्रतिनिधी|**

गुहागर तालुक्यातील झोंबडी काजळवाडी येथील पिण्याच्या पाण्याच्या विहिरीमध्ये एक कोल्हा मृत अवस्थेत आढळून आला. हा कोल्हा पाण्यात राहिल्याने सडलेल्या स्थितीत असल्याचे दिसून येताच येथील ग्रामपंचायत सरपंच अतुल लांजेकर व सदस्य तसेच ग्रामस्थानी या कोल्ह्याला विहिरीबाहेर काढले. हा मृत कोल्हा बराच काळ पाण्यात राहिल्यामुळे तो सडू लागला असून त्याला जंतूही पडले. यामुळे विहिरीचे पाणी दूषित झाले असून परिसरात अत्यंत दुर्गंधी पसरली आहे. हे पाणी ग्रामस्थ पिण्यासाठी वापरत असल्यामुळे लोकांना ताप, उलट्या, जुलाब, पोटदुखीमुळे लोकांची प्रकृती चिंताजनक बनली आहे. झोंबडीचे सरपंच अतुल लांजेकर, उपसरपंच प्रणाली पवार, सदस्या मयुरी लांजेकर, ग्रामसेवक गोरख सोनवणे, दीपक गायकवाड, आशासेविका साक्षी सरदेसाई यांनी घटनास्थळी जाऊन लोकांची त्वरित काळजीपूर्वक दक्षता घेतली व वाडीतील ग्रामस्थांना सोबत घेऊन ग्रामपंचायतीमार्फत विहिरीतील पाणीउपसा करून स्वच्छतेचे काम सुरू केले.

## अनधिकृत फलकांमुळे चौकांचे विद्रुपीकरण

**| पालघर | प्रतिनिधी |**

वसई-विरार शहरात महापालिकेने विविध ठिकाणी चौक तयार करून त्यावर शिल्प उभारून सुशोभिकरण केले आहे. मात्र त्याच चौकांना अनधिकृत फलक लावण्याचे प्रकार वाढीस लागत आहेत. या वाढत्या अनधिकृत फलकांमुळे चौकांचे विद्रुपीकरण होत आहे. अशा जाहिरात फलकांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.



मागील काही वर्षांपासून वसई विरार महापालिकेने शहराच्या सौंदर्यीकरण करण्यावर भर दिला आहे.त्याचाच एक भाग म्हणून पालिकेने शहरातील चौकांचे सुशोभिकरण केले होते. यात शहरातील विविध समाजाची ओळख दर्शविणारी शिल्प व त्याभोवती सजावट केली आहे. मात्र त्यानंतर संबंधित ठेकेदार व पालिकेचे प्रभागीय अधिकारी यांचे त्यांची देखभाल व स्थिती जाणून घेण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यातच आता शहरातील सुशोभित केलेल्या चौकातच विविध ठिकाणी अनधिकृतपणे फलक लावण्याचे प्रकार सुरू झाले आहे. विशेषतः यात राजकीय पक्षाच्या फलकांचा समावेश आहे. या वाढत्या अनधिकृत फलकांमुळे चौकांचे विद्रुपीकरण होत आहे अशा जाहिरात फलकांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## मोबाईल चोरट्यांना अटक

**| मुंबई | प्रतिनिधी |**

घाटकोपर पूर्व येथील पटेल चौकातील भानुशाली मोबाईल शॉपी या दुकानात चोरांनी १६ नोव्हेंबर रोजी चोरी केली. दुकानाचे छपर रात्री तोडून चोरांनी आता प्रवेश केला. त्यानंतर चोरांनी दुकानातील साडेतीन लाख रुपये किमतीचे मोबाईल घेऊन पोबारा केला. दुसऱ्या दिवशी दुकान मालकाच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी या प्रकरणी पंतनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

परिसरातील काही सीसी टीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रणाची तपासणी केल्यानंतर आरोपी एका टॅक्सीतून जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानुसार पोलिसांनी तपास करून हितेश सोळंकी (४१) याला पुणे येथून अटक केली. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली. नवी मुंबईतील बेलापूर परिसरात राहणाऱ्या फिरोज खान (३१) याच्या मदतीने चोरी केल्याची कबुली सोळंकीने पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी फिरोज खानलाही अटक केली. या आरोपींनी चोरलेले सर्व मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले.

## आदिवासी विकास महामंडळाने शेतकऱ्यांचे पैसे लटकवले

**| ठाणे | प्रतिनिधी |**

मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील ५४७ भात उत्पादक शेतकऱ्यांचे सुमारे पाच कोटी रुपये आदिवासी विकास महामंडळाने गेल्या दीड वर्षांपासून लटकवून ठेवले आहेत. या शेतकऱ्यांनी २०२३-२४ मध्ये सुमारे २१ हजार क्विंटल भात महामंडळाच्या भात खरेदी केंद्रावर दिला. त्यानंतर महामंडळाने प्रक्रिया करून या भाताची विक्रीही केली. मात्र ई-पीक पाहणी केली नसल्याचे कारण पुढे करून शेतकऱ्यांना अद्याप फुटकी कवडीही दिली नाही.



या शेतकऱ्यांनी पिकवलेला भात धसई, दुधनोली, माळ, शहापूर या केंद्रांवर आदिवासी विकास महामंडळाला विकण्यात आला. धान्याचा दर प्रतिक्विंटल २ हजार ३८० रुपये एवढा आहे. हे पैसे तातडीने मिळणे गरजेचे असताना अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा झालेला नाही. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते बबन हरणे यांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> **सुमारे ५४७ शेतकऱ्यांच्या सातबाराची पडताळणी करण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या सातबाराची पडताळणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी पिकांची लागवड केली आहे, परंतु ऑनलाइन पीक पाहणी केली नाही. तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयात सादर केला आहे. वरिष्ठांकडून रक्कम देण्याचे आदेश येताच रक्कम शेतकऱ्यांना दिली जाईल.**
>
> **– तुषार वाघ, उपप्रादेशिक अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ, शहापूर**

## हिवाळ्यात बाजरीच्या मागणीत वाढ

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

हिवाळ्यात तापमानघटीमुळे शरीराला अधिक उष्णतेची आणि ऊर्जा देणाऱ्या आहाराची गरज भासते. त्यामुळे पचायला हलकी आणि उष्मांकयुक्त तृणधान्य असलेल्या बाजरीला या काळात बाजारात लक्षणीय मागणी वाढली आहे. गहू आणि ज्वारीपेक्षा बजेटमध्ये मिळणारी असल्याने नागरिकांचा कल बाजरीकडे वेगाने वाढत असल्याचे व्यापाऱ्यांचे मत आहे.



वाशीतील एपीएमसी बाजारात दररोज ५० ते ९० टन बाजरीची आवक होते. वाढत्या मागणीमुळे आवकही वाढली असून दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत. सध्या घाऊक बाजारात २७ ते ४५ रुपये किलो दर मिळत आहे. गहू (२९ ते ४६ रु.) आणि ज्वारी (२६ ते ६५ रु.)च्या तुलनेत बाजरी स्वस्त असल्याने ग्राहकांचे लक्ष तिच्याकडे वळल्याचे एपीएमसीतील व्यापारी वंश ठक्कर यांनी सांगितले. पुढील दोन महिन्यांतही बाजरीची आवक चांगली राहण्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे. वाशीतील एपीएमसी धान्य बाजारात प्रामुख्याने महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थानातून बाजरीची आवक होते.

## तरुणाचा धरणात बुडून मृत्यू

**खेड :** खेड तालुक्यातील खोपी पिंपळवाडी धरणात म्हशींना पाणी पाजण्यासाठी गेलेल्या तरुणाचा धरणात बुडून मृत्यू झाला. बाबाराम मालसिंग ढेबे (३६, रा. खोपी-रामजीवाडी) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो नेहमीप्रमाणे म्हशींना घेवून पाणी पाजण्यासाठी धरणाच्या पाण्यात उतरला होता. याचदरम्यान त्याचा पाय चिखलात रुतल्याने बुडू लागला. काही वेळाने त्याची हालचाल बंद झाली. त्याला ग्रामस्थांच्या मदतीने पाण्याबाहेर काढण्यात आले.

## ‘पाण्याचे नियोजन करणे गरजेचे’

**| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |**

आज देशातील केवळ १७ ते २४ टक्के जनतेला स्वच्छ पाणी मिळते, तर जगातील ७० टक्के आजार हे केवळ दूषित पाण्यामुळे होत असतात. त्यामुळे पाणी जपा, आरोग्यही वाचवा. आजच्या नवीन पिढीला पाण्याविषयी सजग करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जल अभ्यासक व रोटरीयन इंजिनिअर सतीश खाडे यांनी खारेपाटण येथे केले.

खारेपाटण हायस्कूल येथे सिंधुदुर्ग जिल्हा रोटरी परिवार व खारेपाटण रोटरी क्लबतर्फे आयोजित ‘कोकणातील पाणी प्रश्नावर आधारित आधुनिक तंत्रज्ञान’ या कार्यशाळेत ते बोलत होते. खारेपाटण हायस्कूलच्या चंद्रकांत पारिसा रायबागकर सभागृहात रोटरी क्लब खारेपाटणचे अध्यक्ष दयानंद कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. ‘माझे पाणी, माझी जबाबदारी’ उपक्रमांतर्गत संपूर्ण देशभर पाण्याविषयी जनजागृती करणारे जलप्रेमी संतोष खाडे यांचे विद्यार्थी व नागरिकांसाठी मार्गदर्शन आयोजित केले होते. पुढे सतीश खाडे म्हणाले की, कोकणात जरी प्रचंड पाऊस पडत असला, तरी त्याचे नियोजन गरजेचे आहे.

**पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरणार** | **इंधनाची होणार मोठी बचत**

# कचरा वाहतुकीसाठी नवीन मिनी कॉम्पॅक्टर

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई महापालिकेने कचरा वाहतुकीसाठी आधुनिक पद्धतीची ३० नवीन मिनी कॉम्पॅक्टरची खरेदी केली आहे. या नवीन मिनी कॉम्पॅक्टरमुळे मुंबईत दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वहन आता अधिक सुलभ होण्यासोबतच वाहतूक फेऱ्यांची संख्या कमी होऊन इंधनाची बचत होणार आहे. यापूर्वीच्या मिनी कॉम्पॅक्टरच्या तुलनेत नव्या वाहनांना एका फेरीत दुप्पट कचरा वाहून नेण्याची क्षमता आहे. ही वाहने एका सत्रात दोन फेऱ्या करणार आहेत.



मुंबईतील कचरा वाहनाची मोठी प्रक्रिया लक्षात घेऊन आवश्यक सुधारणा करून अद्ययावत वाहने उपलब्ध करून देण्याच्या सूचना मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिल्या होत्या. याआधीच्या वाहनांमध्ये भेडसावणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून परिवहन अभियांत्रिकी विभागाने केलेल्या कल्पक सुधारणा कौतुकास्पद असल्याचे गगराणी यांनी नमूद केले आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी योग्य आसनव्यवस्था, ओला व सुका कचरा यासाठी स्वतंत्र कप्पे, तसेच दीर्घकाळ टिकणाऱ्या साधनसामुग्रीचा वापर यांमुळे मिनी कॉम्पॅक्टरचे आयुष्यमान वाढण्यास मदत होणार असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले. या सुधारणा मुंबईच्या पर्यावरण संवर्धनासाठी देखील उपयुक्त ठरतील, असेही त्यांनी नमूद केले.

कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये, कचऱ्यातून निघणाऱ्या द्रव्यामुळे (लिचेट) धातुपत्रा सतत खराब होत असल्याचे आढळून येत होते. नव्या वाहनांमध्ये ५ मिमी जाडीच्या ‘हार्डोक्स’ स्टील मटेरियलचे फ्लोरिंग वापरले आहे. परिणामी वाहनाचे आयुष्यमान वाढण्यास मदत होणार आहे. तसेच हायड्रॉलिक पद्धतीच्या क्लोजिंग प्लेट कव्हरमुळे वाहनाची मागील बाजू पूर्णपणे बंदिस्त राहून कचरा वाहतुकीचे स्वरूप सुधारले आहे.

### वाहनांसाठी पांढऱ्या निळ्या रंगाची रंगसंगती

मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या ताफ्यातील सर्व वाहनांचे रंग येत्या काळात पांढरा आणि निळा अशा रंगसंगतीत बदलण्याचा प्रशासनाचा मानस आहे. ही प्रक्रिया टप्पेनिहाय पद्धतीने पार पाडली जाईल, अशी माहिती उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांनी दिली. आगामी कालावधीत घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या ताफ्यातील सर्व वाहने ही नव्या रंगसंगतीनुसार रंगवण्यात येणार आहेत.

## निवडक

### मेल-एक्स्प्रेसमधील विक्रेत्यांना युनिफॉर्म



**मुंबई :** खाद्यपदार्थ खरेदी करताना रेल्वे प्रवाशांच्या होणाऱ्या लुबाडणुकीला लगाम बसणार आहे. रेल्वेच्या मेल, एक्सप्रेसमध्ये खाद्यपदार्थांची अधिकृत विक्री करणारे ओळखण्यासाठी इंडियन रेल्वे केटरिंग ॲण्ड टुरिझम कॉर्पोरेशनने (आयआरसीटीसी) त्यांच्यासाठी युनिफॉर्म निश्चित केला आहे. ‘वंदे भारत’ व ‘राजधानी’ यांसारख्या प्रीमियम गाड्यांमध्ये कर्मचाऱ्यांना ‘नेव्ही ब्लू’ या रंगाच्या जॅकेटवर हेल्पलाइन क्रमांकासह युनिफॉर्म देण्यात येणार आहेत. इतर गाड्यांमध्ये कर्मचाऱ्यांना हलक्या निळ्या रंगाचे टी-शर्ट देण्यात येतील. त्यांना क्यूआर कोड असलेली ओळखपत्रेही अनिवार्य करण्यात आली आहेत. याशिवाय दरपत्रकाचे क्यूआर कोड आणि हेल्पलाइन क्रमांक जारी केला आहे. त्यामुळे खाद्यपदार्थांचे अवाच्या सवा पैसे प्रवाशांकडून उकळता येणार नाहीत. शिवाय क्यूआर कोडमुळे विक्रेत्याची ओळख पटणार असून विश्वासार्हता वाढणार आहे.



### निवडणुकीच्या बंदोबस्तासाठी पालघर पोलीस सज्ज

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक दोन डिसेंबर रोजी पार पडणार आहे. निवडणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी व कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पालघर पोलीस दल सज्ज झाले असून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. पालघर जिल्ह्यात पालघर, डहाणू, जव्हार या तीन नगरपरिषदा आणि वाडा नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान दोन डिसेंबर तर मतमोजणी तीन डिसेंबर रोजी पार पडणार आहे. मतदारांना निर्भयपणे मतदान करता यावे व कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एक अप्पर पोलीस अधीक्षक, पाच उपविभागीय पोलीस अधिकारी, आठ पोलीस निरीक्षक, ३६ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ४२४ पोलीस अंमलदार, २३० होमगार्ड्स, केंद्रीय राखीव दलाच्या तीन तुकड्या, राज्य राखीव पोलीस दलाच्या दोन तुकड्या, तीन राखीव स्ट्रयकिंग आणि वाहतूक कर्मचारी अशाप्रकारे पोलीस बंदोबस्त असणार आहे. निवडणुकीदरम्यान ३१५ पैकी ३११ परवानाधारक अग्निशस्त्रे पालघर पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये जमा करण्यात आली आहेत.

### ठाण्यातील जलस्त्रोतांची होणार प्रगणना



**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या जलस्रोतांची आणि सिंचन प्रकल्पांची मोठ्या प्रमाणावर प्रगणना करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने, जिल्हा प्रशासनाकडून अनुभवी बाह्य संस्थांकडून प्रस्ताव मागवले आहेत. या संस्थांच्या नियुक्तीनंतर जिल्ह्यातील जलस्त्रोतांची माहिती गोळा गेली जाणार आहे. जिल्ह्यातील पाणीसाठे, त्यांच्या क्षमतेची सद्यस्थिती आणि सिंचनासाठी उपलब्ध असलेली क्षमता यांचा तंतोतंत आढावा घेणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. जिल्ह्यातील भूजल स्तर हा चिंताजनक असल्याचे विविध सर्वेक्षणातून अनेकदा समोर आले आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सरकारकडून ठाणे जिल्ह्यासाठी विविध महत्वाकांक्षी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील भूजल स्त्रोतांची गणना या उपक्रमातील एक महत्वाचा टप्पा आहे. याच अंतर्गत केंद्र शासनाच्या आदेशानुसार विहिरी, कूपनलिका, शेततळी, सिमेंट बंधारे, धरण, कालवे, बंधारे, उपसा सिंचन योजना, तसेच मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प अशा विविध जलस्रोतांची आणि योजनांची प्रगणना केली जाणार आहे.

### आंबा बागायतदारांसाठी नवे संकट



**थंडी गायब झाल्याने मोहोरावर परिणाम**

**चिपळूण :** कोकणातील हापूस आंबा बागायतदारांसाठी हंगामी उत्पन्नाचा सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे डिसेंबर-जानेवारी महिन्यात येणारा मोहोर. या काळात सलग कमी तापमान राहिल्यास मोहोर योग्य प्रमाणात येतो व टिकून राहतो. याच पार्श्वभूमीवर, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली 'गुलाबी थंडी' अचानक ओसरल्याने आंबा बागायतदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. वातावरणातील तापमान वाढल्याने मोहोरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कृषितज्ज्ञांच्या मते, हापूस आंब्याच्या गुणवत्तापूर्ण मोहोरासाठी आणि भरघोस उत्पादनासाठी किमान १४ अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान सलग २१ दिवस आवश्यक असते. या थंड हवेमुळे झाडाची वाढ नियंत्रित राहते आणि फुलोऱ्यातील स्थिरता टिकते. मात्र रत्नागिरी परिसरात मागील पाच-सहा दिवसांपासून सकाळ-संध्याकाळची थंडी पूर्णपणे गायब झाली आहे. दिवसाचे कमाल आणि किमान तापमान दोन्ही वाढल्यामुळे मोहोर कुजण्याची, किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची तसेच मोहोर पूर्णपणे गळून पडण्याची भीती बागायतदार व्यक्त करत आहेत.

### प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा

**कोर्लई :** अलिबाग तालुक्यातील तळाशेत येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. आपत्ती व्यवस्थापन तज्ञ तथा ज्येष्ठ पत्रकार डॉ.जयपाल पाटील, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष वैशाली भोईटे, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शिंदे, उपशिक्षिका जस्मिन शेख, विद्यार्थी, शिक्षक वृंद यावेळी उपस्थित होते. यावेळी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी तसेच संविधान लिहिण्यास लागलेला काळ व देशातील सर्व जाती धर्मातील जनतेच्या कल्याणासाठी संविधान तयार केल्याची माहीती दिली. तसेच, यात्रेत व प्रवासात आपल्या आई-बाबांपासून दूर अथवा हरविले, तर न घाबरता पोलीस मामा अथवा मावशी यांच्याजवळ जावे, अनोळखी सोबत जाऊ नये आणि आपल्या आई-वडील, काका, मामा यांचे मोबाईल क्रमांकाची चिठ्ठी जवळ ठेवावी म्हणजे तुम्ही सुरक्षित राहाल, असे प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

## निवडक

### कार-बस लेनमध्ये ट्रेलर घुसल्याने टोलनाक्याचे नुकसान

**नवीन पनवेल :** बस आणि कारच्या लेनमध्ये ट्रेलर घातल्यामुळे टोलचे बूथ केबिन आणि इतर सामानाचे नुकसान झाले. तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्या प्रकरणी ट्रेलर चालक अब्दुल तालीम अब्दुल कादिर (रा. उत्तर प्रदेश) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात २८ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. २७ नोव्हेंबर रोजी खारघर कोपरा टोल नाका येथे मुंबईकडे येणाऱ्या लेनवर अचानक मोठा आवाज झाला. यावेळी पुण्याकडून मुंबईकडे येणाऱ्या लेन क्रमांक नऊवर ट्रेलर क्रमांक एम एच ०१ ईयू ५९२२ या सफेद रंगाच्या ट्रेलर चालकाने त्याचे वाहन कार आणि बस लेनमध्ये घुसवले आणि टोल नाकयावरील बूथ केबिन क्रमांक १० जमिनीपासून उखडले. केबिन मधील संगणक, प्रिंटर, सीसीटीव्ही कॅमेरा, लेन कंट्रोल सिस्टीम, पॅनल, फॅन, कॅबिन गार्ड, टोल नाक्याच्या केबिनचे सपोर्ट पोल हे दबून चेपले आणि तीन लाख रुपयांचे नुकसान झाले.

### डॉ. विष्णू पाटील यांचे निधन

**अलिबाग :** पेझारी येथील ज्येष्ठ वैद्यकीय व्यक्तिमत्त्व डॉ. विष्णू वासुदेव पाटील (९४) यांचे दि. २९ नोव्हेंबर रोजी पेझारी येथील राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरातील एक अनुभवी, कर्तव्यनिष्ठ आणि सेवाभावी डॉक्टर गमावले असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.डॉ. पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९३२ रोजी शहापूर (ता. अलिबाग) येथे झाला. लहानपणापासूनच वैद्यकीय क्षेत्रात जाण्याची त्यांची जिद्द दृढ होती. त्यांनी मुंबईतील पोदार कॉलेजातून मेडिकल पदवी घेतली. त्याचबरोबर बीएससी व जीएफ.एमए हे शिक्षणही पूर्ण केले.आपल्या व्यावसायिक कारकीर्दीची सुरुवात त्यांनी वरळी, मुंबई येथील लॅबर कॅम्पमध्ये डॉक्टर म्हणून केली. गरीब व श्रमिक वर्गाला स्वस्त आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे त्यांचे कार्य त्या काळात विशेष मानले जात होते. मुंबईतील कामानंतर त्यांनी १९७४ साली पोयनाड येथे स्वतंत्र प्रॅक्टिस सुरू केली. साधी, मैत्रीपूर्ण आणि रुग्णाला प्रथम मानणारी त्यांची उपचारपद्धती लोकांच्या मनात कायमची घर करून राहिली. १९६८ ते २०१९ या जवळपास ५१ वर्षांच्या दीर्घ काळात त्यांनी हजारो रुग्णांची निःस्वार्थ सेवा केली.मुंबईत वास्तव्यास असताना समाजभान जपत त्यांनी ज्ञान प्रबोधिनी मंडळ स्थापन केले होते. या संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष होते. डॉ. पाटील यांना मकरंद, अविनाश आणि सुषमा अशी तीन मुले असून, तिन्हीही मुले डॉक्टर आहेत. सर्व मुलांना पुढे स्वतःची मुले असून, पाटील कुटुंब वैद्यकीय क्षेत्रातच कार्यरत आहे. डॉ. विष्णू पाटील यांच्या जाण्याने पेझारी, पोयनाड व परिसरात शोककळा पसरली आहे. साधे, संयमी आणि सेवाभावी डॉक्टर म्हणून त्यांची ओळख होती. रुग्णांना त्यांनी नेहमीच मायेने आधार दिला, ही आठवण अनेकांच्या मनात कायम राहील. त्यांच्या निधनाने वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील एक दीर्घकाळ सेवाभावी युगाचा अंत झाला आहे.



### रेशनिंग दुकानदारावर गुन्हा दाखल करा

**नवीन पनवेल :** रेशनिंग दुकानाला प्राधिकार पत्र नसताना देखील कोप्रोली येथे रेशन दुकान सुरू होते. या प्रकरणी दुकान चालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक आदित्य अशोक जानोरकर यांनी तहसीलदार पनवेल यांच्याकडे २८ नोव्हेंबर रोजी केली.

**■ आदित्य जानोरकर यांची मागणी**

पनवेल तालुक्यातील कोप्रोली येथे प्राधिकार पत्र नसतानादेखील रेशनिंग दुकान चालवले जात होते. गेल्या कित्येक वर्षांपासून हा गैरप्रकार सुरू होता. तसेच या ठिकाणी तक्रार वही, धान्य नोंद तसेच इतर गोष्टी नव्हत्या. व दुकान देखील वेळेत उघडत नव्हते. प्राधिकार पत्र नसताना हे रेशनिंग दुकान सुरूच कसे राहिले असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. याला पुरवठा अधिकाऱ्यांचे वरदहस्त होता. आजी-माजी पुरवठा अधिकाऱ्यांनी या दुकानाची कधी पाहणी केली नाही का, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित झाला. नागरिकांनी तक्रार केल्यानंतर हे दुकान २०२४ मध्ये बंद करण्यात आले. मात्र, या दुकान चालकावर अद्याप गुन्हा दाखल झाला नाही. २०२४ मध्ये हे दुकान बंद केल्यानंतर अद्याप देखील यावफ कारवाई झालेली नाही. त्यामुळे तहसीलदार मीनल भोसले यांच्याकडे या दुकानदारावर आणि अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आदित्य जानोरकर यांनी पत्राद्वारे केली. यावेळी माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल असे तहसीलदार यांनी सांगितले असल्याची माहिती जानोरकर यांनी दिली.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **नागाव येथे घरी राहून** कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल. सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : 7875866555, 8408829555
- **विकणे आहे -** अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९
- कॉम्प्युटर ग्राफीक्स डियायनर, डिटीपी ऑपरेटर व मशिनवर काम करण्यासाठी मुले/मुली पाहिजेत. स्लॅष ग्राफिक्स, अलिबाग ९८२३६५०५५१
- **अलिबागमध्ये** समर्थ मठ, पिंपळभाट ,गोंधळपाडा, रेवस बायपास , विद्यानगर परिसरामध्ये २ BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्कंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको एजंटचे स्वागत आहे मो. ७७५८९७५४०७
- **फिशिंग मच्छिमारी व्यवसायासाठी** सेकंडहॅण्ड ३५० ते ४०० पॉवर इंजिन असलेली बोट विकत घेणे आहे मो. ९९२३०३६१५६
- **पी.एन.पी. बिल्डींग नं.३** १ला मजला ४०० sqft रूम भाड्याने देणे आहे. डॉक्टर / मेडिकल फॅसेलिटी प्राधान्य - ९७६३३१७७३३.
- **वॉन्टेड :- अलिबागमध्ये सकाळी नऊ** ते बारा स्वयंपाक करणेसाठी बाई. पाच हजार मो.८५३०३०९७६५
- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९


**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## पालिकेच्या ठेकेदाराकडून कचरा उचलण्यात दिरंगाई
# तळोजात कचराकोंडी कायम

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कचरा उचलण्यासाठी ठेकेदार दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे ९७५ कारखान्यांना फटका बसत आहे. पीएमसी कंत्राटदाराच्या दुर्लक्षामुळे तळोजा एमआयडीसीमधील उद्योग त्रस्त झाले असून, यावर तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

येथील उद्योगांकडून पीएमसीला मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर भरला जात असूनही मूलभूत नागरिक सुविधा विशेषता दररोजचा कचरा संकलन पूर्णपणे दुर्लक्षित होत आहे. टीआयएनने याबाबत पीएमसीला वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतेही सुधारणा झालेली नाही. पूर्वी टीआयए सदस्य, पीएमसीचे वरिष्ठ स्वच्छता अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यासह एक संयुक्त ग्रुप तयार करण्यात आला होता. मात्र, या गटातही हे स्पष्ट झाले आहे की कचरा केवळ उद्योगांनी वारंवार मागणी केल्यावरच उचलला जातो. नियमित आणि प्रणालीबद्ध महानगरपालिका सेवेसारखा नाही. टी आय एनने या कामकाजाची पद्धत अव्यसायिक, निष्काळजी आणि अस्वीकार्य असल्याचे



म्हटले आहे.

राज्य सरकार उद्योगांना पाठिंबा देत असताना पीएमसी मात्र अडथळे निर्माण करत आहे. येथील उद्योग पीएमसीच्या कार्यप्रणालीमुळे त्रस्त झाले आहेत. एमआयडीसीतील कचरा संकलन वेळेत होत नाही, त्यामुळे कचरा कंपनीच्या गेटवर किंवा आत मध्ये पडून राहतो. या कचऱ्यातून तीव्र दुर्गंधी निर्माण होते याचा त्रास कारखानदार व कामगारांना होतो.

**पालिका आयुक्तांकडे टीआयएची मागणी**

कचरा कंत्राटदाराला देय असलेली रक्कम तत्काळ थांबवावी. तळोजा औद्योगिक पट्ट्यात दररोज कचरा संकलन सुनिश्चित करणारा सक्षम व विश्वसनीय नवीन कंत्राटदार नेमावा. पीएमसीने न दिलेल्या सेवांच्या बदल्यात उद्योगांकडून घेण्यात आलेल्या कराची प्रमाणानुसार रक्कम परत करावी.

> **तळोजातील कारखानदारांना कचऱ्याची समस्या भेडसावत असून, ठेकेदार वेळेत कचरा उचलत नाही. त्यामुळे दुर्गंधी निर्माण होते. निष्काळजीपणा करणारे ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी.**
> **- सतीश शेट्टी, अध्यक्ष, टीआयए**

### ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील चेन लंपास

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

६९ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सहा ग्राम वजनाची सोन्याची चेन खेचून तिघेजण स्कुटीवरून पसार झाले. याप्रकरणी २८ नोव्हेंबर रोजी तिघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संगीता वानखेडे या कामोठे, सेक्टर २१ येथे राहात असून, २८ नोव्हेंबर रोजी सकाळी त्या सेक्टर २१ येथून वॉकिंगला गेल्या. खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगकडून जेएनपीटी रोडकडे त्या गेल्या. यावेळी सिल्वर रंगाच्या स्कुटीवरून तीन तरुण हे त्यांच्या मागे-पुढे करत होते. यावेळी सेक्टर २५ मधून चालत जात असताना त्यांनी स्कुटी थांबवली आणि त्यांनी वानखेडे यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून चोरटे पसार झाले.

## सोन्याच्या कर्णफुलांची चोरी

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

सामान पॅकिंगसाठी मदत करण्याचे सांगून सोन्याच्या कानातील फुले चोरी केल्याप्रकरणी पार्वती दिपू शर्मा (रा. सेक्टर दोन • एलआयजी, कळंबोली) यांच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २७ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

शैल कुमारी प्रीतम बिंद ह्या एलआयजी दोन सेक्टर दोन, कळंबोली येथे राहत असून दहा मे रोजी त्यांना गावी जायचे असल्याने त्या घरात पॅकिंग करत होत्या. यावेळी पार्वती शर्मा घरात आल्या आणि सामान पॅकिंग करून देत असल्याचे सांगितले. यावेळी बॅगेत कपडे आणि दागिने पॅकिंग करण्यासाठी पार्वती शर्मा यांच्या समोर ठेवले. शर्मा यांनी पॅकिंग करत असताना सोन्याची फुले बाहेर काढून बघून मला याचे वजन किती असेल असे विचारले. यावेळी त्यांची शेजारी महिला कपडे शिवण्याकरता दिलेले कपडे घेऊन आली. त्यानंतर पार्वती शर्मा सर्व सामान पॅकिंग करून निघून गेली. शैला कुमारी ह्या १२ मे रोजी उत्तर प्रदेश येथे पोहोचल्या. लग्नाच्या कार्यक्रमासाठी जायचे असल्याने त्यांनी सोन्याचे दागिने पाहिले. त्यात सोन्याची फुले सापडली नाहीत. त्यांनी बॅग चेक केली मात्र सोन्याची फुले सापडून आले नाहीत. पार्वती शर्मा हिला फोन द्वारे सोन्याच्या कानातील फुलांची विचारपूस करण्यात केली असता तिने उडवा उडवीची उत्तर दिले. ४१ हजार ४५६ रुपयाची सोन्याची फुले चोरीला गेल्या प्रकरणी पार्वती दिपू शर्मा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## ‘जीवन कौशल्ये’ पुस्तकाचे प्रकाशन

**। खांब । प्रतिनिधी ।**

तरुण पिढीला सक्षम, सजग आणि आत्मविश्वासपूर्ण बनवण्यासाठी सुदर्शन केमिकल कंपनीने एक मोलाची सामाजिक जबाबदारी पार पाडत ‘जीवन कौशल्य’ या नावाचे नवे आणि उपयुक्त पुस्तक द.ग. तटकरे महाविद्यालय, कोलाड येथे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विशेष सोहळ्यात प्रकाशित करण्यात आले. सुदर्शन ग्रुपचे अन्सार डांगे, पराग फुकणे, अमर चांदणे, प्रा. तिरमले यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.




जीवन कौशल्य विकासाचा हा संपूर्ण उपक्रम सुदर्शन केमिकलच्या सी.एस.आर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष मार्गदर्शनातून साकारला आहे.

सध्याच्या बदलत्या जगात तरुणांना तर्कशक्ती, आत्मानुशासन, संवादकौशल्य, समस्या निराकरण क्षमता, भावनिक स्थैर्य आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

या सर्व घटकांचा समावेश असलेले हे पुस्तक विद्यार्थ्यांना व युवकांना नवी दिशा देणारे ठरणार असल्याचे अन्सार डांगे यांनी सांगितले. पुस्तकाचे रोहा व महाड आणि सुतारवाडी (मुळशी) मधील असे १५ विद्यालयांतील तब्बल दोन हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना जीवन कौशल्याचा थेट लाभ मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## सिवूड्स हद्दीत अनधिकृत पार्किंगला ऊत

**सोसायटी, शाळा चेअरमन, मुख्याध्यापकांची बैठक**

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

सिवूड्स वाहतूक चौकी येथे सिवूड्स हद्दीतील सोसायटी/शाळा यांचे चेअरमन व मुख्याध्यापक यांची अनधिकृत पार्किंगबाबत नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये त्यांना सूचना देण्यात आल्या.



सोसायटी मधील सदस्यांनी त्यांची वाहने ही सोसायटीच्या बाहेर लावू नये. सोसायटी मधे जर वाहन पार्किंग साठी जागा नसेल तर रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहने पार्क न करता कोणत्याही एका बाजूस पार्क कराव्यात व एका बाजूचा रस्ता आपत्कालीन वाहने, कचऱ्याची वाहने, रुग्णवाहिका यांच्यासाठी खुली ठेवावी. सोसायटी सदस्य जर त्यांची वाहने सोसायटी बाहेरील रस्त्यावर लावत असतील तर त्यांनी त्यांच्या सोसायटीच्या नावाचे स्टिकर्स बनवून ते त्यांचे वाहनांवर लावावेत जेणेकरून सदर वाहनांवर वाहतूक विभागाची सततची कारवाई टाळता येईल. आपले विभागामध्ये जर बेवारस वाहन पार्क झालेले असेल तर त्याचा जीपीएस फोटो सिवूड्स वाहतूक शाखेच्या व्हॉट्सॲप नंबरवर पोस्ट करावा जेणेकरून ह्या गाड्यांवर महानगरपालिकेमार्फत काढण्याची कारवाई करता येईल. अनधिकृत ऑटो रिक्षा स्टँड्सवर कारवाई करण्यासाठी त्यांना आश्वासित केले आहे. अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले.

सर्व सोसायटीच्या चेअरमनना एक व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून त्या ग्रुपमध्ये सिवुड्स वाहतूक शाखेचा नंबर समाविष्ट करण्यास सांगितले आहे. जेणेकरून सर्व सोसायटीधारकांना सिवूड्स वाहतूक शाखेशी त्वरित संपर्क करता येईल. सिवूड्स विभागातील सर्व शाळांना त्यांच्या शाळेबाहेर २०० मीटर्सपर्यंत कोणत्याही प्रकारच्या गाड्या न लावण्याबाबत सांगण्यात आले. शाळेमध्ये जेव्हा पालक आपल्या पाल्यांना सोडायला किंवा नेण्यासाठी येताना आपली गाडी न आणता पब्लिक ट्रान्सपोर्टचा वापर करावा. सिवूड्स रेल्वे स्टेशन येथून रेल्वे ने प्रवास करणाऱ्या मेंबर्सना मॉलसमोर पार्किंग न करता मॉलची अंडरग्राऊंड पार्किंग वापरण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वाहतुकीच्या इतर नियमांबाबत प्रबोधन केले. मपोनि मोहिनी लोखंडे व पोहवा सचिन कडू यांनी येथील सदस्यांना मार्गदर्शन केले.

## पनवेल बार असोसिएशनची निवडणूक रंगतदार

**ॲड. रत्नदीप पाटील यांचा दणदणीत विजय**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल पनवेल बार असोसिएशनच्या प्रतिष्ठेच्या निवडणूक २०२५ मध्ये काट्याची टक्कर पाहायला मिळाली. शहराच्या न्यायक्षेत्रातील प्रभावी मानल्या जाणाऱ्या या निवडणुकांमध्ये ॲड. रत्नदीप राम पाटील यांनी ५३६ मतांसह अध्यक्षपदावर विजय मिळवत पनवेलच्या कायदेविषयक वर्तुळात आपली ताकद दाखवली. दुसऱ्या बाजूला, भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक आणि प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ यांना ५०८ मतांवर पराभव स्वीकारावा लागला, आणि हा धक्कादायक निकाल पनवेलमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे.

उपाध्यक्ष पदावर ॲड. सचिन अंबाजी म्हात्रे यांनी ६०२ मतांसह विजय मिळवला, तर त्यांच्या विरोधात असलेल्या ॲड. संतोष जोमा म्हात्रे यांना ४२६ मते मिळाली. सचिव पदाचा निर्णायक निकाल ॲड. प्रल्हाद घनश्याम खोपकर यांच्या बाजूने ७२२ मतांनी लागला, तर प्रतिस्पर्धी ॲड. नित्यानंद राम ठाकूर यांना ३०५ मतांवर समाधान मानावे लागले.

महिला राखीव (सहसचिव) पदासाठी ॲड. दिपाली रामदास गावंड यांनी ६०३ मतांसह विजय मिळवत आघाडी घेतली, तर ॲड. हेमा सिताराम भगत यांना ४२७ मते मिळाली. खजिनदार पदावर ॲड. धनराज कान्हा तोकडे यांनी ८१० मतांचा विक्रमी आकडा गाठत विजय मिळवला, तर ॲड. महेबूब गैबी पटेल यांना २१९ मते मिळाली. सहखजिनदार म्हणून ॲड. विशाल लक्ष्मण डोंगरे यांनी ६७१ मतांवर विजय मिळवला; त्यांच्या विरोधात ॲड. हेमंत शिंदे यांना १२३ आणि ॲड. रोहिदास आगलावे यांना २२७ मते मिळाली.

ऑडिटर पदाची बाजी ॲड. भूषण मोरेश्वर म्हात्रे यांच्या नावावर पडली ७२४ मतांची सरस कामगिरी, तर ॲड. भास्कर रामचंद्र पाटील यांना ३०६ मते मिळाली.

कार्यकारिणी सदस्य पदासाठी ॲड. विजयेंद्र नारायण मुंढे यांनी ५७४ मतांनी आणि ॲड. इर्शाद रमझान शेख यांनी ४८८ मतांनी विजय मिळवला. तर ॲड. आशिष विजय पनवेलकर (२४७), ॲड. जयसिंग शेरे (८३) आणि ॲड. नागेश हिरवे (३९७) यांना पराभवाचा सामना करावा लागला.

महिला राखीव कार्यकारिणी पदात ॲड. ज्योती पी. राऊत उरणकर यांनी ५५९ आणि ॲड. छाया रामदास म्हात्रे यांनी ४२९ मतांनी विजय मिळवला. त्यांच्या विरोधात ॲड. समीना खान (११३), ॲड. दिपाली बोहरा (३२५) आणि ॲड. आस्मिता भुवड (३८०) यांनी निवडणूक लढवली.

## शेतकरी चिंताग्रस्त

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वरकस भागातील भातकापणी कामे जवळपास पूर्ण होत आली आहेत. परंतु, पाणथळी शेतजमिनीतील पिके अनेक ठिकाणी कापणीची बाकी आहे. शेतामध्ये अद्याप चिखल असल्याने कापणी करताना अडचणी निर्माण होत आहेत, त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. भातपिके कापणीयोग्य होऊन बराच काळ सरला आहे. परंतु, अद्याप शेतातील जमीन सुकलेली नसल्याने कापणी करणे अवघड झाले आहे. त्याचबरोबर शेतात चिखल असल्याने मजूरसुद्धा या कामासाठी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे भातपिकाची कापणी होणार तरी कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. यामध्ये शेतकऱ्याला मोठा आर्थिक तोटा होणार असून, तो कधीही भरुन येणार नाही.

## प्रभाकर आगलावे यांचा वाढदिवस उत्साहात

**। चौल । प्रतिनिधी ।**

चौल-भोवाळे पर्वतनिवासी दत्त मंदिराचे गुरव प्रभाकर आगलावे यांचा ६५ वा वाढदिवस वार्डे गुरुजी नवनाथ मंडळ, चौलच्यावतीने मोठ्या उत्साहात गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात आला. गेली ४५ वर्षे निःस्वार्थ वृत्तीने गुरव म्हणून श्री. आगलावे दत्तगुरुंची सेवा करीत आहेत. यावेळी उपस्थित दत्तभक्तांनी मंदिरात उपस्थित राहून गुरव श्री. आगलावे यांना शुभेच्छा दिल्या.



प्रभाकर आगलावे २० वर्षांचे असतानाच दत्तटेकडीवल दत्तगुरुंची सेवा करण्यासाठी आले. तेव्हापासून आजतागायत ते उत्साहाने दत्तगुरुंची सेवा करीत आहेत. श्री. आगलावे यांच्या माध्यमातून दत्तमहाराजांची पहाटे पाच व सायंकाळी सहा वाजता महाआरती केली जाते. आलेल्या दत्तभक्तांचे त्यांच्याकडून स्वागत केले जाते. दत्तटेकडीवर येणाऱ्या भक्तांना श्री. आगलावे यांच्याकडून उत्तम मार्गदर्शन आणि सेवा दिली जाते. आपले संपूर्ण आयुष्य दत्तगुरुंच्या चरणी लीन झालेल्या श्री. आगलावे यांचा वाढदिवस दत्तगुरुंच्या साक्षीने साजरा करण्यात आला. यावेळी प्रकाश पाटील व त्यांच्या सौभाग्यवतींच्या हस्ते प्रभाकर आगलावे यांचे औक्षण, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने दत्तभक्त उपस्थित होते. दरम्यान, श्री. आगलावे यांनी उपस्थितांचे आभार मानताना सांगितले की, दत्तगुरुंची सेवा ही माझ्यासाठी ईश्वरी आशीर्वाद असून, भक्तांचे प्रेम आणि सहकार्य मला नेहमीच प्रेरणा देते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशिष वासुदेव, सचिन राऊत, अरुण टेकाळकर, संदीप नागावकर, निकेश घरत, राकेश नाईक, अनिकेत नाईक आणि वार्डे गुरुजी नवनाथ मंडळ, चौलचे सर्व सभासद आणि दत्तभक्तांनी मेहनत घेतली.

**पेणधर नावाचा पेंधर असा अपभ्रंश | धानसरल बसथांब्यावर गावाचे नावच गायब**

# पालिकेला गावांच्या नावाचं वावडं

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पालिकेतील प्रभाग एकमधील पेणधर गावाचे प्रवेशद्वार असलेल्या कमानीवर पालिकेतर्फे लावण्यात आलेल्या फलकावर पेणधरऐवजी पेंधर अशा उल्लेखाचा फलक पालिकेकडून लावण्यात आला आहे. तर, याच प्रभागातील धानसर गाव येथे बांधण्यात आलेल्या बस स्टॉपवर गावाच्या नावाचाच उल्लेख नसल्याने पालिकेला गावांच्या नावाचं वावडं आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

तालुक्यातील २३ ग्रामपंचायत आणि २९ गावांचा समावेश पनवेल पालिकेत करण्यात आला आहे. या ठिकाणी सेवा सुविधा देण्यासाठी पालिका प्रशासनाकडून प्रयत्न सुरु आहेत. याचाच एक भाग म्हणून गावाबाहेर उभारण्यात आलेल्या स्वागत कमानीवर पालिकेत समाविष्ट गाव म्हणून गावाचे नाव टाकण्याच काम पालिकेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक १ मधील पेणधर गावाच्या कमानीवरदेखील पालिकेच्या माध्यमातून गावाचे नाव टाकण्यात आले आहे. मात्र, हे नाव टाकताना पेणधर असे नाव न लिहिता पेंधर असे नाव लिहून नावाचा अपभ्रंश करण्यात आल्याने पालिकेच्या मराठी भाषेच्या अज्ञानाविषयी नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

पालिकेच्या संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन नावातील बदल तात्काळ दुरुस्त करावेत, अशी मागणी पनवेलकरांकडून करण्यात येत आहे. या गंभीर बाबीकडे पालिका अधिकारी लक्ष देणार का, असा प्रश्न विचारला जात आहे.




**पालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष**

महापालिकेच्या हद्दीत असणाऱ्या गावांच्या नावांची अशा प्रकारे संबंधित प्रशासनाकडून वाट लावण्यात आली आहे. याबाबत पालिका प्रशासनाने लक्ष देणे गजरेचे असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. तरी, या गंभीर बाबीकडे लक्ष घालून त्यात तात्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे. परंतु, पालिका प्रशासनाला या गोष्टीकडे लक्ष द्यायला वेळ नसल्याने सध्याचे चित्र आहे.

**बस थांब्यावर गावाचे नावच नाही**

पालिकेच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक १ मधील धानसर गाव येथे बस थांबा बांधण्यात आला आहे.या थांब्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे. थांब्यावर गावाच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला नसून, विद्युत वाहिनीची जोडणी नसताना अर्धवट काम झालेल्या या थांब्याचे उद्घाटन आ. प्रशांत ठाकूर यांच्या करण्यात आले आहे.

# महाडमध्ये महेंद्र घरत यांची ‘भेल पे चर्चा’

। चिरनेर । प्रतिनिधी ।

महाड नगरपरिषद निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी महेंद्र घरत यांनी महाडमध्ये नुकत्याच मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी तेथील नागरिकांचा काँग्रेसकडे ओढा असल्याचे दिसून आले. काँग्रेस हा सर्वसामान्यांचा पक्ष




आहे, असे त्यांनी मतदारांना पटवून दिले. त्यानंतर त्यांनी चक्क भेल पुरीच्या स्टॉलवर आपला मोर्चा वळवला. तेथे भेल पुरीचा आस्वाद घेत मतदारांशी संवाद साधला. त्यामुळे महाडमधील मतदारांमध्ये महेंद्र घरत यांचीच चर्चा सुरू होती.

त्यामुळे महाडमधील नगर परिषदचे काँग्रेसचे उमेदवार चांगल्या मतांनी विजयी होतील, असे चित्र दिसत आहे.

यावेळी काँग्रेसचे महाडमधील नगर परिषदचे उमेदवार, रायगडच्या प्रभारी राणीताई अग्रवाल, मिलिंद पाडगावकर आणि एम.जी. ग्रुपचे सहकारी उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड नगरपरिषद अलिबाग हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत व त्या मिळकतीचे विद्यमान मालक तौफीक एजाझ छांरावाला यांचेकडून मी सैफ खलील मुकादम रा.रेवदंडा कायम मालकी हक्काने विकत घेण्याविषयी ठरले असून लवकरच खरेदीखत रजिस्टर करण्यात येणार आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याबद्दल खात्री करण्याकरीता ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग येथील सि स नं. ९५२, ९५३,९५४अ/१, ९५४क/अ/१ या मिळकतीवरील मोरेश्वर सह. गृह. संस्था मर्या. अलिबाग या इमारतीमधील ए विंग, तळ मजल्यावरील व्यापारी गाळा क्र. ४ क्षेत्र ३७५ चौ. फुट बिल्टअप, नगरपरिषद मालमत्ता क्र.ALB000001714 जुना मालमत्ता क्र. Z1MKT001716 मॅन्युअल मालमत्ता क्र.1452A Wing गाळा नं.०४.

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर कुणाचीही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क साठेकरार व खरेदीखत या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरुपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

याप्रमाणे मुदतीत कुणाचीही तक्रार, हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध समजून मिळकतीच्या मालकाबरोबर रजिस्टर खरेदीखत पूर्ण केले जाईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.
हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/१२/२०२५

सही/-
**सैफ खलील मुकादम**
रा.२३२५, विठोबा आळी, बायपास रोड जवळ,
रेवदंडा ता.अलिबाग, जि.रायगड - ४०२२०२

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती जिजाबाई तुकाराम सोनावळे व इतर ४ रा. आर्ढे ता. कर्जत, जि. रायगड यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे आर्ढे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २४/१/अ एकुण १.०७.०० पोटखराबा ०.६७.०० असे एकुण क्षेत्र १.७४.०० गुठे पैकी लिहून देणार यांचे हिश्याचे ४०गुंठे, जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०१/१२/२०२५

**ॲड चंद्रकांत ज्ञानेश्वर जंगम**
पत्ता. ऑफिस नं २५, दुसरा मजला
यशवंतराव चव्हाण संकुल लोणावळा
ता.मावळ जि. पुणे ४१०४०१
भ्रमणध्वनी ९३७०७२२४५६

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. विनीता अजय वाणी रा. चितळसर मानपाडा ठाणे ४००६०७ यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गौळवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ५३/८ एकुण ०.२१.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा,बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०१/१२/२०२५

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**१) मौजे - मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. /प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| १) श्री. रविंद्र लक्ष्मण पिसाट<br>२) सौ. रश्मी लक्ष्मण पिसाट | १५ | १४/अ/१० | २.९६.८२ | ५ | १५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :-फ्लॅट नं.४, ए-विंग, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१.

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक : ०१/१२/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मार्केवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी | रुपये | पैसे |
| श्री. विशाल विश्वास जोशी व इतर | ५ | १७ | ०-१९-०० | ० | २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
पत्ता- उक्रुळ, पो.चिंचवली,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. अमर कृष्णा म्हसे**
दिनांक :-०१/१२/२०२५
मो. नं. ९०२९०४०३४०
ई मेल:- amarmhase3142@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी यांच्या सदर मिळकतीचे मालक यांचेकडुन कायम खरेदी खताने घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहु जमिनी या सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जात व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल त्या मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे .

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे / हिस्सा | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री.रत्नाकर काशिनाथ तळपे इतर ७ | ६८/१ | ०.११.३० | ०.६२ |
| श्री. अरविंद भागुजी कांगणे इतर १ | ६८/२ | ०.३०.९० | ४.४४ |
| श्री. समीर यशवंत साळोखे | ६९/९ | ०.०१.०० | ०.०२ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु.वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ॲड. योगेश तानाजी आगज**
बी.ए.एलएल. बी.
पत्ता :- फ्लॅट नं.४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी, मुद्रे, कर्जत,
जिल्हा- रायगड- ४१० २०१
मो. नं. ७२७६८१७८९०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे खांडपे, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक रोहित वासदेव मल्होत्रा यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ५८ | १/ब | ०-३४-०० पैकी २ गुंठे रस्त्यासाठी दिलेले क्षेत्र वगळुन विकत दिलेले क्षेत्र ०-३२-०० | ०-०४ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/११/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुनिल सुंदर कदम व पुजा आशुतोष कर्णिक यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १५ | ६ | ०-४९-६० पैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे ०-२९-०० इतके विकत दिलेले क्षेत्र | ३-८७ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/११/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली बिनशेती जमिन मिळकत व त्यावरील ग्रामपंचायत घर क्रमांक ५९४ आमचे अशिल सौ. मयुरी विजयसिंग चव्हाण यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विजय लक्ष्मण नागपुरे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. हिस्सा नं. | क्षेत्र चौ. मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ५५/१ | ३३०.०० | ३३.०० |

त्यामध्ये असलेले ग्रामपंचायत घर क्र.५९४ क्षेत्र ७५० चौ. फुट वरील वर्णन केलेल्या मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०१/१२/२०२५.

सही/-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

## सिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पेण

जवाहर रोड, प्रेम नगर, चिंचपाडा, पेण, जि. रायगड ४०२१०७

जा.क्र.
दिनांक : ३०-११-२०२५

**पुनर्विकासासाठी निविदा सादर करणेबाबत**

संस्थेचे नाव : सिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पेण
पत्ता : जवाहर रोड, प्रेम नगर, चिंचपाडा, पेण, जि. रायगड ४०२१०७
नोंदणी क्रमांक :- सर्व्हे नंबर ६४ क, क्षेत्रफळ : १७७० चौमी
एकूण विंग : ०३ (A-B-C) निवासी सदनिका ३५
संस्थेच्या इमारतीला ३५ वर्षे पूर्ण झाली असल्याने इमारत पुनर्विकास करणेस निविदा मागविण्यात येत आहेत.
१) कोऱ्या निविदा जाहिरात दिलेपासून १५ दिवसांत कडून नेण्यात यावेत.
२) भरलेल्या निविदा रक्कम रुपये ५००० डिमांड ड्राफ्ट द्वारे संस्थेच्या नावे काढण्यात यावी.
३) भरलेली निविदा संस्थेच्या PMC कडे दिनांक १५-१२-२०२५ पर्यंत देण्यात यावी.
४) अधिक माहितीकरिता संस्थेचे PMC श्री. उल्हासकुमार व्ही.पाटील यांचेशी संपर्क साधावा. ९४२२४९५२०६/७७४४०९५२०६
पत्ता : पाटील असोसिएट, गाळा नं. १, जय कॉम्प्लेक्स, क्रिकेट स्टेडीयम जवळ, पेण रायगड
patilulhaskumar@gmail.com

**सही/-**
**सचिव**
**सिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**

**सही/-**
**सिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत व त्यामधील घर आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक राजीव गजानन शेट्ये यांचेकडून खरेदी करण्याचे योजले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | ७७९ | ०-०५-३०<br>०-००-००<br>एकुण : ०-०५-३० | १.१९ |

सदर मिळकत व मिळकतीत असणारे ग्रुप ग्रामपंचायत नागाव हद्दीतील घर क्र. १४०६, क्षेत्र ७९२ चौ. फुट (७३.६१ चौ.मी) या नोटसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवासांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबीची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ता.०१/१२/२०२५

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ताः फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळिवण्यात येते की,

ज्याअर्थि १.रोहिणी तुकाराम जाधव, २. वनिता एकनाथ जाधव, ३. श्री. प्रशांत एकनाथ जाधव, २ व ३ राहणार राम मंदिर जवळ, राम मंदिर हक लाईन समोर, छत्रपती को. ऑप. सोसायटी, रुम नं. ५७, घाटकोपर पश्चिम, मुंबई ४०००८६ ४ सुचिता संदिप कदम, राहणार : ४०३, विरार महादेव मंदिर, काटागाम, सुरत, पो. काटागाम, सुरत शहर, जि. सुरत, गुजरात. ३९५००४ ५ प्राची प्रणित डांगे राहणार- रुम नं. ३१०, ३रा मजला, वदर अपार्टमेंट, जी-वदानी रोड, विरार वेस्ट, वसई, पालघर. ४०१३०५ ६. रंजिता रोहितभाई भालिया, राहणार ११८, पटेल पार्क, ताडवाडी, वारियाव, जि. सुरत, गुजरात ३९४५२० ७. निकीता राजू पाटील राहणार फ्लॅट नं. ६०५, इ-२०, स्वप्नपुर्ती सेक्टर-३६, खारघर, पो. खारघर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१० यांच्या मालकी वहीवाटीच्या मौजे पिटसईकोंड, ता. तळा, जि. रायगड. येथिल खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली जमिन मिळकत आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-पिटसईकोंड, ता. तळा, जि. रायगड येथिल**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/गट | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १. | १३७ | १ | ०-६२.०० | ००-२५ |

वर नमूद केलेली मिळकत सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतीचे मालक श्रीमती. रोहिणी तुकाराम जाधव व इतर, यांच्या कडून आमचे अशिल श्री.जिगनु सदु जाधव राहणारः श्री मलंग रोड, शिव मंदीर शेजारी नेवाळी, कल्याण पुर्व व श्री. निकेश गोपिनाथ पाटील, कु. अनमोल अशोक पाटील राहणारः मु.पो. तोंडरे, ता. पनवेल, जि. रायगड. यांनी कायम स्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेहि हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्रीमती. रोहिणी तुकाराम जाधव व इतर यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. ०१/१२/२०२५.

**श्री. मयुर शिवराम कुंभारकर,**
ॲडव्होकेट पत्ताः मु. चिंध्रण, पो. देविचापाडा,
ता. पनवेल पनवेल -४१०२०८, जि. रायगड.

## सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. / हि.क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| करंजाडे-०९ | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | |
| १ | वडघर | ७९ | १३०/४/अ | ०-२९-५ | ७५० चौ.मी. | नोड करंजाडे, सेक्टर-२A, भूखंड क्र.३६, क्षेत्र-७५२ चौ.मी. | **१) श्री. हनुमान केशव पाटील २) श्री. संदीप शंकर पाटील** | १) श्री. भाऊ काना पाटील, २) श्रीमती रुक्मीणी केशव पाटील, ३) श्री. श्याम केशव पाटील, ४) श्री. पंढरीनाथ केशव पाटील, ५) श्रीमती. लता शंकर पाटील, ६) श्री. सचिन शंकर पाटील, ७) श्रीमती वनिता संजय पाटील, ८) श्री. शशीकांत सिताराम भगत, ९) श्री. दिलीप सिताराम भगत, १०) श्रीमती. हेमा दिलीप भगत, ११) श्रीमती. सुनिता प्रमोद भोईर, १२) श्रीम. शैला बाळाराम सुरते, १३) श्रीमती. सारीका राजेश सुरते **उपरोक्त नमूद भूधारक यांनी दस्त क्र. पवल ५-१२०७६-२०२२ दिनांक २१.०७.२०२२ रोजीच्या हक्कसोडपत्रान्वये त्यांचेकडील हक्क व हितसंबंध हे खालील व्यक्तींच्या लाभात सोडलेले आहेत. १) श्री. हनुमान केशव पाटील २) श्री. संदीप शंकर पाटील** |
| २ | वडघर | ५३ | ८२/३A+१३+३K +५/२ | ०-०८-१ | | | | |
| ३ | वडघर | ७९ | ३९/२/ब | ०-४८-८ | | | | |
| | | | | **१-९९-५** | | | | |
| १ | ८६३ उलवे | १६५ | ४५/४ | ०-२८-५ | २१०० चौ.मी. रे.मु.क्र.७४/१९९७ या दाव्यामधील मा.न्यायालयाचे दि.०४.०५.२००२ रोजीच्या आदेशानुसार सदर मंजूर एकूण २१०० चौ.मी. पात्रतेपैकी श्रीमती.महादीबाई अनंत म्हात्रे (वादी क्र.२) यांच्या हिश्यास येणाऱ्या ३५० चौ.मी. पात्रतेपैकी उर्वरित १५० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भुखंड क्र.७C, सेक्टर-२२,-क्षेत्र-१५० चौ.मी. | **श्रीमती. महादीबाई उर्फ शेवंतीबाई अनंत म्हात्रे** | **मा. दिवाणी न्यायाधिश क्र. स्तर दावा क्र. रे.मु.क्र.७४/१९९७** |
| | | १६५ | ४५/६<br>४७/४ | ०-३४-७<br>०-०८-९ | | | | |
| | | १७९ | १६/१<br>१६/१५ | ०-१४-०<br>०-०१-० | | | | |
| | | १७९ | ४२/१+५ +६+७/३<br>४४/१पै<br>४४/२(C)<br>४४/३<br>५६/२ | ०-३४-०<br>०-१६-०<br>०-०६-०<br>०-०५-६<br>०-५५-६ | | | | |
| | | १७९ | ८३/८(a)<br>८३/८(b) | ०-०८-०<br>०-०७-० | | | | |
| | | १७४ (२) | १६/२पै | ०-२१-० | | | | |
| | **एकुण क्षेत्र** | | | **२-४०-७** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे. तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.


**अर्ज सादर करावयाचे ठिकाण:** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,
तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको/जनसंपर्क/३८६/२०२५-२६**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# रांचीत 'हिट' शो

## रोहित शर्माने रचला नवा विश्वविक्रम

## भारतीय खेळाडू दक्षिण अफ्रिकेवर बरसले



**। रांची । वृत्तसंस्था ।**

भारत आणि दक्षिण आफ्रिका संघात रविवारी (दि.३०) एकदिवसीय मालिकेताल सुरुवात झाली असून पहिला सामना रांचीमध्ये खेळवला गेला. यावेळी पहिल्याच सामन्यात दोन दिग्गज रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याकडून दमदार खेळ पाहायला मिळाला. त्याचबरोबर रोहित शर्माने एक दिवसीय क्रिकेट सामन्यातील एका विक्रमाला देखील गवसणी घातली आहे.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडेन मार्करमने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय संघाकडून यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा यांनी डावाची सुरुवात केली. जैस्वालने आक्रमक सुरुवात केली; परंतु, तो १८ धावांवर बाद झाला. त्यानंतर मात्र रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी भारताचा डाव सावरताना मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. रोहित सुरुवातीला संयमी खेळत होता; मात्र, त्यानंतर त्याने आक्रमक खेळ केला. विराट कोहलीने सुरुवातच आक्रमक केली. त्याने त्याची गती शेवटपर्यंत ठेवली. या दोघांनी शतकी भागीदारी केली. त्यानंतर विराटने अर्धशतक पुर्ण केले. त्यानंतर रोहितनेही त्याचे अर्धशतक पुर्ण केले. परंतु, रोहित २२व्या षटकात पायचीत झाला. रोहितने ५७ धावांची खेळी केली. यावेळी विराट आणि रोहित यांच्यात १३६ धावांची भागीदारी झाली.



रोहित नंतर ऋतुराज गायकवाडने कोहलीला साथ देण्याचा प्रयत्न केला. परंतु, ऋतुराज ८ धावांवर बाद केले. ऋतुराजनंतर वॉशिंग्टन सुंदरही १३ धावांवर बाद झाला.

त्यानंतर विराटला केएल राहुलची चांगली साथ मिळाली. यादरम्यान विराटने १०२ चेंडूत त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ८३ वे शतक केले. विराटने शतकानंतर पुन्हा गती वाढवली. ३९ व्या षटकात प्रनेलन सुब्रयनविरुद्ध विराटने सलग चार चेंडूवर ४,६,६,४ अशा धावा ठोकल्या. अखेर त्याची वादळी खेळी ४३व्या षटकात थांबली. विराटने १३५ धावांची खेळी केली. विराट आणि केएल राहुल यांच्यात ७६ धावांची भागीदारी झाली.

विराटनंतर रवींद्र जडेजाने आक्रमक खेळताना केएल राहुलची साथ दिली. केएल राहुलनेही त्याच्या धावांची गती वाढवत अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर केएल राहुल ६० धावा करून बाद झाला. त्यानंतर शेवटच्या षटकात रवींद्र जडेजा (३२) आणि अर्शदीप सिंग (०) हे दोघे बाद झाले. शेवटी हर्षित राणा (३) आणि कुलदीप यादव (०) नाबाद राहिले. भारताने ५० षटकांत ८ बाद ३४९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून मार्को यान्सिन, नांद्रे बर्गर, कॉर्बिन बॉश आणि ओटनील बार्टमन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### क्रिकेट विश्वातील षटकार किंग

रोहित शर्माने या सामन्यात ५ चौकार आणि ३ षटकारांसह ५१ चेंडूत ५७ धावांची दमदार खेळी केली. त्याचबरोबर त्याने एकदिवसीय सर्वाधिक षटकारांचा विक्रम मोडीस काढला आहे. त्याने अफ्रिका विरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात तीन षटकार मारुन 'षटकार किंग' ठरला आहे. या आधी रोहित शर्माने षटकारांचा बादशाह ख्रिस गेल (३३१) याला मागे टाकले होते. आता त्याने एकूण ३५२ षटकार मारून शाहिद अफ्रिदी (३५१) याला मागे टाकले आहे.

### कोहलीची 'विराट' खेळी

या सामन्यात विराट कोहलीने दमदार खेळी करत आपले ५२वे एकदिवसीय शतक पुर्ण केले आहे. त्यामुळे एकाच प्रकारात ५२ शतक करणारा तो पहिला क्रिकेटपटू ठरला आहे. यापूर्वी सचिनने कसोटीत ५१ शतके केली होती. यादरम्यान विराटने १०२ चेंडूत त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ८३ वे शतक केले. विराटने १२० चेंडूत ११ चौकार आणि ७ षटकारांसह १३५ धावांची खेळी केली. तसेच, ३९ व्या षटकात प्रनेलन सुब्रयनविरुद्ध विराटने सलग चार चेंडूवर ४,६,६,४ अशा धावा देखील ठोकल्या.

### मायदेशात रोहि-राट सरस

रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा भारतासाठी एकत्र खेळण्याचा हा ३९२ वा आंतरराष्ट्रीय सामना आहे. त्यामुळे सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळणाऱ्या भारतीय जोड्यांमध्ये आता रोहित आणि विराट पहिल्या क्रमांकावर आले आहेत. त्यांनी सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांचा विक्रम मोडला आहे. सचिन आणि द्रविड यांनी ३९१ सामने एकत्र खेळले आहेत. त्यापाठोपाठ सौरव गांगुली आणि राहुल द्रविड यांची जोडी असून ते ३६८ सामने एकत्र खेळले आहेत. तसेच, रोहित आणि विराट यांनी एक दिवसीय सामने मायदेशात खेळताना भागीदारीत २६६७ धावा केल्या आहे. त्यामुळे मायदेशात एकदिवसीय सामना खेळताना भागीदारीत सर्वाधिक धावा करणारी जोडी ठरली आहे. त्यांनी माहेला जयवर्धने आणि कुमार संगकाराच्या जोडीला मागे टाकले आहे. त्यांनी श्रीलंकेत २५९६ धावा भागीदारीत केल्या आहेत.

# ओम साईश्वरचे संघ अंतिम फेरीत



**। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुरस्कृत, मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने, इन्स्पायर फाऊंडेशन आयोजित कुमार मुली मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेला रंगतदार स्वरूप प्राप्त झाले आहे. या स्पर्धा दादर येथील केशवराव दाते क्रीडांगणात पार पडत आहेत. या स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या थरारक सामन्यांमुळे प्रेक्षकांनी रोमांच अनुभवला. मुलींचा अंतिम सामना ओम साईश्वर सेवा मंडळ वि. शिवनेरी सेवा मंडळ तर मुलांचा अंतिम सामना ओम साईश्वर सेवा मंडळ वि. सरस्वती स्पो. क्लब (अ) यांच्यात होणार आहे. विशेष म्हणजे ओम साईश्वर सेवा मंडळाचे दोन्ही संघ अंतिम फेरीत दाखल झाले आहेत.

मुलींच्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने आर्य सेनावर ५-३ (मध्यंतर ५-१) असा एक डाव राखून २ गुणांनी दिमाखदार विजय साजरा केला. ओम साईश्वरच्या निर्मिती परब, यशस्वी कदम, कादंबरी तेरवणकर, काजल मोरे यांनी सुरवातीपासूनच सामन्यात वर्चस्व ठेवत दमदार विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली. मुलींच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात शिवनेरी सेवा मंडळाने सरस्वती कन्या संघचा ८-५ (मध्यंतर ८-२) असा एक डाव राखून ३ गुणांनी पराभव केला. शिवनेरीच्या मुस्कान शेख, सिद्धी शिंदे, आरुषी गुप्ता व त्रिशा गुप्ता यांनी संघाला अंतिम फेरीत स्थान मिळवून दिले.

मुलांच्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सरस्वती स्पो. क्लब (अ) ने वैभव स्पो. क्लबवर १०-७ (मध्यंतर १०-३) असा एक डाव राखून ३ गुणांनी धुव्वा उडवला. सरस्वतीच्या रोहन कांबळे, साई तुळसनकर, मनीष पालये, ओमकार खरंगटे यांनी मोठ्या विजयाची पायाभरणी केली अंतिम फेरीत स्थान मिळवले. मुलांच्या दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने विद्यार्थी क्रीडा केंद्र (अ) चा ९-७ (मध्यंतर ४-३) असा चुरशीच्या सामन्यात २ गुणांनी पराभव करत अंतिम फेरू गाठली. ओम साईश्वरच्या अधिराज गुरव, निषाद ताम्हणेकर, सार्थक माडये, सुजल शिंत्रे, प्रशित मोरे यांनी सुरवातीपासूनच सामन्यात वर्चस्व ठेवत अंतिम फेरीत पोहचले.

# लिओनल मेस्सीचा भारत दौरा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अर्जेंटिनाचा विश्वविजेता कर्णधार आणि फुटबॉल जगतातील महान खेळाडू लिओनल मेस्सी भारताचा चौफेर दौरा करणार आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या या दौऱ्यात कोलकाता, हैदराबाद, मुंबई आणि नवी दिल्ली अशी चार प्रमुख शहरे मेस्सीच्या पावलांनी गजबजणार आहेत. मेस्सी १३ डिसेंबर रोजी कोलकात्यातून आपल्या दौऱ्याला सुरुवात करणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी तो हैदराबादला पोहोचणार आहे. १४ डिसेंबरला मुंबई आणि १५ डिसेंबरला नवी दिल्ली येथे दौरा संपन्न होईल.

# भारताचा कॅनडावर दणदणीत विजय



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सुलतान अझलान शाह हॉकी स्पर्धेत भारताने कॅनडावर १४-३ असा दणदणीत विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. जुगराज सिंगने चार गोल करत चमक दाखवली, तर इतर खेळाडूंनीही प्रभावी कामगिरी केली. आता भारताचा अंतिम सामना बेल्जियमशी होणार आहे. या सामन्याची सुरुवात नीलकांत शर्माने चौथ्याच मिनिटाला केलेल्या गोलने झाली. त्यानंतर शेवटच्या सत्रात ६ गोल झाले. अमित रोहिदासने ४६व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. ५०व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकवर जुगराजने आणखी एक गोल केला. त्यानंतर कॅनडाकडून पेनल्टी कॉर्नरवर एक गोल केला. त्यानंतर ५६व्या मिनिटाला संजयने, ५७व्या व ५९व्या मिनिटाला अभिषेकने गोल केले. त्यामुळे भारताने १४-३ असा विजय मिळवला.

## निवडक


### फॅफ ड्यू प्लेसिसची आयपीएलमधून माघार

**नवी दिल्ली :** दिल्ली कॅपिटल्सने रिलीज केल्यानंतर फॅफ ड्यू प्लेसिसने आता इंडियन प्रीमिअर लीग २०२६ साठी होणाऱ्या लिलावातून माघार घेतली आहे. त्याने आयपीएल २०२६ ऐवजी पुढल्या वर्षी पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळण्याचा निर्णय जाहीर केला आहे. फॅफने सोशल मीडियावर पोस्ट लिहून ही माहिती दिली. त्याने लिहिले की, १४ वर्ष आयपीएलमध्ये खेळल्यानंतर पुढील वर्षी होणाऱ्या आयपीएलच्या लिलावात नाव न नोंदवण्याचा निर्णय मी घेतला आहे. हा खूप मोठा निर्णय आहे आणि मागे वळून पाहताना खूप कृतज्ञता येते. ही लीग माझ्या प्रवासाचा एक मोठा भाग राहिली आहे. जागतिक दर्जाच्या खेळाडूंसोबत, अद्भुत फ्रँचायझींसाठी आणि अविश्वसनीय चाहत्यांसमोर खेळण्याचे भाग्य मला लाभले. भारताने मला मैत्री आणि अनेक आठवणी दिल्या आहेत. ज्यांनी मला क्रिकेटपटू म्हणून आणि एक व्यक्ती म्हणून आकार दिला आहे, असे



### सलामीवीर अभिषेक शर्माचे वादळ

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा सध्या सय्यद मुश्ताक अली चषकात धमाकेदार कामगिरी करत आहे. बंगालविरुद्ध सुरू असलेल्या सामन्यात त्याने १२ चेंडूत वादळी अर्धशतक झळकावले. त्यानंतर पुढील २० चेंडूत त्याचे शतक पूर्ण केले. १२ चेंडूत अर्धशतक झळकावून अभिषेकने त्याचा मार्गदर्शक युवराज सिंगच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. ३२ चेंडूत शतक झळकावून त्याने भारतासाठी टी-२० मध्ये सर्वात जलद शतकांच्या यादीत ऋषभ पंतची बरोबरी केली आहे. या डावात अभिषेकचा स्ट्राइक रेट ३०० पेक्षा जास्त झाला. या धमाकेदार खेळीमुळे अभिषेकला टी-२० मध्ये भारताकडून सर्वात जलद शतकांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर आणले आहे. भारताकडून टी-२० मध्ये सर्वात जलद शतक करण्याचा विक्रम उर्विल पटेलच्या नावावर आहे, त्याने गेल्या वर्षी याच स्पर्धेत त्रिपुराविरुद्ध २८ चेंडूत शतक झळकावले होते. उर्विल पटेलने या वर्षी सय्यद मुश्ताक अली चषकता सर्व्हिसेसविरुद्ध ३१ चेंडूत शतक झळकावले होते.



# पुण्यात रंगला उपांत्य पूर्व फेरीचा थरार

**। पुणे । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असो.च्या यजमान पदाखाली कुमार-कुमारी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा पिंपरी चिंचवड-बोपखेल येथील दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत सुरू आहेत. या स्पर्धेतील कुमार विभागात अहमदनगर, परभणी, पुणे ग्रामीण व ठाणे ग्रामीण संघ तर कुमारी विभागात पुणे ग्रामीण, पिंपरी चिंचवड, सांगली व पालघर संघ उपांत्य फेरीत दाखल झाले आहेत.

मुलांच्या उपांत्य पुर्व फेरीत अहमदनगर संघाने पालघर संघावर ५०-३० अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मद्यंतराला अहमदनगर संघाकडे ३०-१८ अशी आघाडी होता. अहमदनगर खेळाडूंच्या आक्रमक चढाया व पकडींमुळे संघाने सहज विजय मिळविला. त्यानंतर पाच पाच चढायांमध्ये अत्यंत अटितटीच्या झालेल्या सामन्यात ठाणे ग्रामीण संघाने कोल्हापूर संघावर ३५-३४ असा एक गुणांनी विजय मिळविला. तर, परभणी संघाच्या बाबुराव जाधव, रमेश गायकवाड यांच्या चढाया व अंकुश भांडे व अतुल जाधव यांच्या पकडींच्या जोरावर रत्नागिरी संघावर ४८- १७ अशी एकतर्फी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. परभणी संघाने पहिल्या डावात दोन व दुसऱ्या डावात एक लोन लावत २९-६ अशी आघाडी घेतली होती.

मुलींच्या पहिल्या उपांत्य पूर्व फेरीच्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने ठाणे शहर संघावर ४५-३० अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे २६-८ अशी भक्कम आघाडी होती. दुसऱ्या उपांत्य पूर्व फेरीच्या सामन्यात सांगली संघाने मुंबई उपनगर पूर्व संघावर २६-२२ अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला सांगली संघाकडे १६-७ अशी आघाडी होती.

# उरण क्रिकेटची अंतिम फेरीत धडक



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्यावतीने १९ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उरण क्रिकेट स्पोर्ट्स असो. संघाने दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघावर शानदार विजय मिळवत अंतिम फेरीमध्ये धडक दिली आहे. त्यामुळे आता उरण संघाचा अंतिम सामना भेंडखळ क्रिकेट अकॅडमी बरोबर होणार आहे. हे दोन्ही संघ उरण तालुक्यातील असल्याने येथील युवा खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावर निर्माण झाले आहे.

या स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात यूसीएसए संघाने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर संघाला फलंदाजी साठी आमंत्रित केले. प्रथम फलंदाजी करतांना चॅम्पियन्स खारघर संघाने ३७.२ षटकात सर्व गडी गमावत १९८ धावा केल्या. त्यामध्ये नितेश निषाद (५०) याने सर्वाधिक धावा काढल्या. तर, ओम भोईर ४१ व सनत कोळी याने ३३ धावा काढून संघाला योगदान दिले. उरण संघाकडून अमेय पाटील याने सर्वाधिक ५ फलंदाजाना तंबूत धाडले. तर, ओम म्हात्रे ३ व अर्चित म्हात्रेने २ गडी बाद केले. प्रतिउत्तर देताना उरण संघाने ३५.२ षटकात ४ गडी गमावत १९९ धावांचे लक्ष सहज गत्या पूर्ण केले. उरण संघाचा सलामीवीर स्मित पाटील याने (नाबाद १०२) आपले शतक पूर्ण केले. त्याला मधल्या फळीतील अष्टपैलू खेळाडू ओम म्हात्रे याने (नाबाद ५५) भक्कम साथ दिली. चॅम्पियन्स खारघर कडून ओम भोईर याने ३ फलंदाज बाद केले.

# संघ निवड चाचणी कार्यक्रम जाहीर

**नेरळ :** महाराष्ट्र राज्य टेनिस क्रिकेट संघटनेच्यावतीने होणाऱ्या टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा संघ जाहीर केला जाणार आहे. त्यासाठी निवड चाचणी स्पर्धा दि. ७ डिसेंबर रोजी नेरळ येथे आयोजित करण्यात आली आहे. या निवड चाचणीमध्ये १९ वर्षाखालील संघाची घोषणा केली जाणार असल्याची माहिती रायगड जिल्हा टेनिस क्रिकेट असो. कडून देण्यात आली आहे. महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असो. व सातारा जिल्ह्यातील असो. यांच्या विद्यमाने दि. १८ ते २१ डिसेंबर दरम्यान सातारा येथे १९ वर्षांखालील राज्यस्तरीय स्पर्धा होणार आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्यातील दोन्ही संघ सहभागी होणार आहेत. खेळाडूंनी ७ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून नेरळ येथील धामोते बी.एस.टी स्कूल शेजारील मैदानात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खेला इंडिया विद्यापीठ स्पर्धा | आर्चरीत आदिती स्वामीचे सोनेरी वेध

# महाराष्ट्राच्या मुलींची दमदार कामगिरी



**। जयपूर । प्रतिनिधी ।**

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींची मक्तेदारी दिसून आली. आर्चरीत विश्वविजेत्या आदिती स्वामीने सोनेरी वेध घेतला. वेटलिफ्टिंगमध्ये गीतांजली जगदाळेने सुवर्ण, तर वैष्णवी पवारने रौप्यपदक पटकावले. तसेच, हमालीची मुलगी भक्ती वाडकरने ४ पदकांची लयलूट केली आहे. तर, संस्कृती पाटीलने ज्युदोत कांस्यपदकाची कमाई केली.

शिवाजी विद्यापीठाकडून खेळताना अपेक्षेप्रमाणे आदिती स्वामीने कंपाऊंड महिला वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. वैयक्तिक अंतिम फेरीत १९ वर्षीय अदितीने लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या तनिपर्ती चिकिथाला १४७-१४३ असा पराभव करून आपली हुकमत दाखवून दिली. तसेच, वेटलिफ्टिंगमधील ६३ किलो वजन गटात १६७ किलो वजन उचलून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गीतांजली जगदाळे सुवर्णपदकाला गवसणी घातली. जलतरण स्पर्धेतही महाराष्ट्राच्या मुलींनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दिक्षा यादवने १५०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्य, २०० मीटर फ्रीस्टाईल, ८०० मीटर फ्रीस्टाईल, फ्रीस्टाईल व मिडले रिले शर्यतीत कांस्य अशी पाच पदके जिंकण्याचा पराक्रम केला आहे. भक्ती वाडकरनेही १ रौप्य व ३ कांस्यपदकांचा मिळून चौकार झळकविला. आहिल्यानगरमधील वैष्णवी पवारने वेटलिफ्टिंगमधील ८० किलो वजन गटात रूपेरी पदकांचा करिश्मा घडविला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून खेळणाऱ्या वैष्णवीने सलग दुसऱ्यांदा खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत पदक जिंकले आहे. कोल्हापूरतील शिवाजी विद्यापीठाच्या संस्कृती पाटीलने ज्युदोतील महिलांच्या ७८ किलो वजनी गटात कांस्यपदकाची कमाई केली आहे. संस्कृतीचे आजोबा मारुती पाटील व चुलते अरूण पाटील कुस्तीगीर होते. पुण्यातील क्रीडा प्रबोधिनीत ती सराव करत असते. घरात कुस्तीचा वारसा असताना तिने कुस्ती सोडल्यानंतर ज्युदो खेळात चकमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले आहे.

### हमालाच्या पोरीचा पदकांचा चौकार

भक्ती वाडकरचे वडिल राहूल वाडकर हे कोल्हापूरमधील राधरनगरी शासकीय धान्य गोदामात हमालाची नोकरी करीत आहेत. तिने खेला इंडियात चमकदार कामगिरी करत १ रौप्य व ३ कांस्यपदकांचा मिळून चौकार झळकविला आहे. हमालाच्या पोरीने ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये रूपेरी यश संपादन केल्यानंतर २०० मीटर बॅकस्ट्रोक, फ्रीस्टाईल व मिडले रिले शर्यतीत कांस्यपदकांची कमाई केली. शासनाच्या पुण्यातील क्रीडा प्रबोधिनी ती कसून सराव करीत असते. गत आसामधील स्पर्धेत १ सुवर्ण, ३ रौप्य व १ कांस्य अशी पाच पदकांची कमाई भक्तीने केली होती.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)